म. ग्रं. सं. वाचनालय. ठाणे
विषय ग्रा. वां.
दा.क्र. १६२३८
IRBK-0116237
IRBK-0116237

भारत पाक युद्ध-कथा माला
भाग १

# विजयंता भारत

(कुमार कथा)

अशोक देशपांडे

संजय
प्रकाशन, पुणे ४

IRBK-0116237

IRBK-0116237

संजय प्रकाशन–एकसष्ट

प्रकाशिका

सौ. ललिता शंकर भावे

९१७।२२ फर्ग्युसन कॉलेज रोड

पुणे ४

© अशोक देशपांडे

श्रीपाद–सदन

वीर सावरकर पथ

पंढरपूर

प्रकाशन दिनांक

१ ऑगस्ट १९७५

लो. टिळक पुण्यतिथी शके १८९७

मूल्य ३ रुपये ५० पैसे

मुखपृष्ठ—जोशी आर्टस्

मुद्रक :

ज. ग. जोशी

जनार्दन प्रेस

सदाशिव पेठ, पुणे ३०

रात्रंदिवस थंडीवाऱ्यात,

शत्रूच्या हल्ल्याची तमा न करता,

भारताला विजय मिळवून देणाऱ्या,


जवानांस...

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जेस्सोरचा महावीर | ५ |
| २. | मला विमाने पाडू द्या | ११ |
| ३. | श्रीनगरचा बाजी प्रभू देशपांडे | १६ |
| ४. | ठाणे परत घेतले | २१ |
| ५. | मी वचनाला जागलो | २७ |
| ६. | वाऽरे शत्रू | ३३ |
| ७. | ते कर्तव्याला जागले | ३७ |
| ८. | हात तुटला तरी लढला | ४३ |
| ९. | शत्रूच्या खंदकात उडी | ४८ |
| १०. | परत येणार नाही | ५२ |
| ११. | शत्रूला कंठस्नान | ५७ |
| १२. | बलुच्याला घडली अद्दल | ६१ |

आ. क्र. १६२३८
बा-वा

# १. जेस्सोरचा महावीर!



मेजर दलजीतसिंह नारंग ! मेजर दलजीतसिंह नारंग ! दुसरे तिसरे काही नाही बांगला युद्धातील एक भीम. एक महान बलशाली योद्धा. ज्याला कशाचेही भय उरले नाही. मृत्यू तर ज्याच्या खिसगणतीत होता. तोफा व रणगाडयांची तो पर्वाही करीत नव्हता. रणचंडी साक्षात त्याच्या अंगांत संचारली होती. मग त्याला कशाचे भय ? महावीर रणमर्द भितात पराजयाला. भेकडांना भीती शत्रूची. रणझुंझार भारतीय जवान शत्रूला पाठ दाखवीत नाहीत. जी कामगिरी घेतलेली आहे ती तळहातावर शीर घेऊन पार पाडतात. त्यांच्या घराण्यात वाण असते सतीचे.

याह्यासुराच्या मगरूर सेनानींनी बांगलात धुमाकूळ घातला. न नाही, थोर नाही, स्त्री नाही, वृद्ध नाही · · · कोणीही

त्यांच्या तावडीतून सुटले नाही. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने 'नाझीं' च्या मदतीने लक्षावधी ज्यूंची कत्तल केली. पण त्या नररक्तपिपासू हिटलरलाही याह्यासुराने मागे टाकले. त्या याह्यासुराची आता वेळ भरली होती. त्यानेच हवाई हल्ल्याची खोडी काढल्यामुळे भारताला युद्धात पडावे लागले. पूर्व पाकिस्तानच्या नरडीचा घोट घेण्यास भारतीय सेना सर्व बाजूनी तुटून पडली. डाक्का हे 'लक्ष्य' ठरवून सिल्हट, कोमिल्ला, बोयरा, हिली, सैदपूर, रंगपूर, अगरतला, चितगाँव, कॉकसबझार, जेस्सोर वगैरे बाजूने भारतीय विजयी सेना घुसू लागली.

याह्यासुराने प्रचंड तयारी केलेली होती. अन्नधान्याचा व दारूगोळयाचा महाप्रचंड साठा करून ठेवला होता. चिनी व अमेरिकनांच्या फुशीमुळे तो शेफारलेला होता. भारताला किस झाडकी पत्ती समजत होता. आपल्याच जनतेवर अत्याचार केल्यामुळे त्याचे दिवस भरत आले होते.

बांगलात ज्या काही ठिकाणी याह्यासुराने भारतीय जवानाना टक्कर देण्याचा प्रयत्न केला त्यात जेस्सोरचा अग्रक्रमांक लागेल. जेस्सोर न पडू देण्याचा शत्रूने आटोकाट प्रयत्न केला. परंतु भारतीय जवानांचा रणावेश पाहून साऱ्याच आघाडीवर शत्रूचे शेंदाडशिपाई पळत सुटले होते.

भारतीय रणगाडा-पथकाचे नेतृत्व जेस्सोर भागात मेजर-दलजीतसिंह नारंग करीत होते. शिवाय त्यांच्या मदतीला जवानांची एक बटॅलियनच्या बटॅलियन होती. जेस्सोर भागातून शत्रू भारतीय भूमीवर तोफांतून आग ओकीत होता. सीमेवरचा भाग त्याने भाजून पोळून काढला होता. त्या मस्तवाल तोफा बंद पाडून शत्रूला तेथून हुसकावून लावायचे होते. शत्रूचा विलक्षण जोर होता.

मेजर दलजीतसिंह नारंगांनी आपल्या सेनेची व्यवस्थित रचना करून घेतली. आपले कौशल्य पणाला लावले. रणगाड्यांच्या बाबतीत तर त्यांनी असा काही विलक्षण व्यूह रचला की शत्रू पुरता चक्रावून जायला हवा. आपल्या हाताखालील अधिकाऱ्याना व जवानाना साऱ्या सूचना दिल्या. लेफ्ट. कर्नल सुरेंद्र कपूर व लेफ्ट. कर्नल चित्तूर वेणुगोपालांनी जेस्सोर आघाडी सांभाळली होती. साऱ्या योजना तयार केल्या होत्या. मेजर नारंगांच्यावर सर्वांत महत्त्वाची जोखीम सोपविलेली होती. १९६५ मध्ये त्यांनी रणगाडा दलाचे ' खेमकरण ' विभागात यशस्वी नेतृत्व केलेले होते. किती तरी ' पॅटनासूर ' जमीनदोस्त केले होते.

त्याचा फायदा त्यांना आता मिळाला होता. १९६५ चा शत्रूचा अनुभव घेऊन त्यांनी सारी योजना केली. फक्त प्रतिकार एवढेच शत्रूचे धोरण होते. त्यामुळे मेजर नारंगांना एकदम धडक द्यावयाची होती. मुसंडी मारायची होती. लांबपर्यंत आग ओकणाऱ्या लांब लांब पल्ल्याच्या तोफा प्रथम नष्ट करावयाच्या होत्या.

आखलेल्या योजनेप्रमाणे मेजर नारंगांनी आपले रणगाड्याचे पथक पुढे ढकलले. ' विजयंता ' रणगाडे शत्रूच्या उरावर रोरावत चालले. रणगाड्यानी अशी काही आग ओकायला सुरवात केली की शत्रू बावरून गेला. एवढे अवजड रणगाडे पण भिंगरीसारखे सुसाट धावत, पळत होते. शत्रूचा प्रतिहल्ला चुकवीत होते. शत्रूने आग ओकायला आरंभ केला होता. ' विजयंता ' वर त्याचा रोख होता. पण एकही रणगाडा त्याला नष्ट करता येईना.

ह्या वेळी मेजर नारंग कोठे होते ? कुठे लांब ? छे ? बाजूला ? छे ? रणगाड्यात ? छे ? कुठे बंदिस्त ठिकाणी ? मुळीच नाही. एका रणगाड्यावर उभे होते व आपल्या पथकाला सूचना देत

होते. पथकाचे संचलन करीत होते. प्रचंड गोळामारी चालू होती ना? अहो! विचारताय् काय? रणगाड्यावर मेजर उभे होते? पोलादी आवरणात बसले नव्हते? अहो, सांगता काय? बसत नाही ना विश्वास? बसणार कसा. पण जेस्सोरच्या रणभूमीने हे जगावेगळे दृश्य पाहिले. जेस्सोरच्या रणभूमीला अभिमान वाटला. ती भूमी शत्रूची होती. पण रणमर्दांचे कौतुक करणारी होती. शत्रूच्या तोफा जातिवंत आग ओकीत असताना त्याची काडीमात्र क्षिती न बाळगता मेजर नारंग तांडवनृत्य करणाऱ्या रणगाड्यांवर उभे होते. याह्यासुराच्या उरावरच जणू हे जगावेगळे पिसाट नर्तन चालू होते!

नराधमालाही लाजविणारे पापी सेनानी व गनर्स हे दृश्य पाहून क्षणभर स्तिमित झाले. पापी अधिकारी रणांगणावर कुठे उठून दिसत नव्हते. कुठे तरी आडबाजूला बसून सूचना देत होते. जिवावर उदार झालेला हा भारतपुत्र त्यांनी डोळा भरून पाहिला असेल. आपल्या प्राणांची बाजी लावून हा रणगाजी शत्रूची प्यादी मागे ढकलू लागला होता.

मेजरच जर रणगाड्यावर उभा आहे तर कुठला रणगाडा रणभूमी सोडून मागे हटेल? कोण पुढे जाणार नाही? सारे रणगाडे तोफांची पर्वा न करता शत्रूवर तुटून पडले. साऱ्या गनर्संना विलक्षण चेव आला. जशा भिंगऱ्या इकडे तिकडे नागमोडी पळाव्यात तसे सारे रणगाडे फिरत होते. शत्रूची तोफ न् तोफ टिपत होते. शत्रूच्या गोटात घाबरगुंडी उडाली. सेनेचा आत्मविश्वास खचत चालला. एकेक चुकार शिपाई पळू लागले. पळणारच. त्यांना देशापेक्षा स्वतःचा प्राण प्यारा होता. त्याना आठवण होत होती आपल्या बायकापोरांची. ते काही भारतीय जवान

नव्हते. रणांगणावर रणांगणाशिवाय भारताच्या सुपुत्राना दुसरे तिसरे काही दिसत नाही, आठवत नाही. त्यांना दिसतो फक्त शत्रू. त्याचे रक्त. त्याची नरडी.

शत्रू पळू लागला. पिसाट आग ओकणाऱ्या तोफा बंद पडू लागल्या. भारतीय जवान घोषणा देत पुढे घुसू लागले.

" इंदिरा गांधी की जय ! "

" मुजीबूर रेहमान ऽ की जय ! " मुक्तिवाहिनीच्या जवानानी घोषणा दिली.

" भारत–बांगला दोस्ती झिंदाबाद ऽ ऽ "

जेस्सोरचा दिमाख संपला. जेस्सोर शत्रूला लढविता आले नाही. भारतीय जवानानी व मुक्तिवाहिनीने मुसंडी मारली.

अरेरे ! हे काय ? मेजर नारंग एकदम कोसळले. पळता पळता शत्रूने कावा साधला की काय ? होय, खरे आहे. भारताचा हा जगावेगळा रणदीपक त्यानी अचूक टिपला. ' एम्. एम्. जी. ' च्या गोळ्यांनी त्यांचा बळी घेतला. शत्रूने घात केला. जेस्सोरचा विजयाचा आनंद आता जवानाना मिळणार नव्हता.

रणगाड्यावर उभे राहून लढणारा झुंजार भारतीय रणवीर लढता लढता कोसळला होता. जेस्सोरचा हा महावीर खरोखरच मरूनही अमर झाला. एक नवे राष्ट्र उदयाला येत होते, येणार होते, त्याच्या निर्मितीसाठी एक भारतीय हिरा हरपला. पण त्याचे तेज लोपले नाही. तो अधिक दीप्तीमान झाला. तेजस्वी बनला. काळ्याकुट्ट याह्याखानाने निर्मिलेल्या अंधारात एक नवा प्रकाश त्याने निर्माण केला.


मेजर दलजीतसिंह नारंग . . . . ! तुम्हाला कल्पना नाही. तुम्ही कसले पिसाट धाडस केलेत ! तुमच्या पराक्रमाने आम्ही सारे

भारतीय भारावून गेलो आहोत. आमची पिढी तर तुम्हाला विसरणार नाहीच. पण भारतमातेचे भविष्यकालातील सारे भारत-भाग्य-विधाते तुमचे स्मरण करतील. बांगलातील प्रत्येक नागरिकाला तर तुमचे विस्मरण कधीच होणार नाही. जेस्सोरच्या परिसरात त्या दिवशी अश्रूशिवाय दुसरे काय होते ? त्या बिचाऱ्यांचे अश्रू पुसायला तुम्ही धावून आलात पण त्यानाच अश्रू ढाळायला पुन्हा लावले तुम्ही !

तुमच्या महापराक्रमाबद्दल तुम्हांला ' महावीरचक्र ' मिळाले आहे. तुम्ही जरी ते पाहू शकत नाही तरी तुमचा जेस्सोरभोवती हिंडणारा आत्मा मात्र निश्चित सुखावेल.

* * * *

# २. मला विमाने पाडू द्या!



राजस्तानच्या आघाडीवर भारतीय जवानांनी मुसंडी मारली. एका रात्रीत जवान किती तरी आत पाकी हद्दीत घुसले. सीमेलगतची पाकी खेडी चलाख पाकी अधिकाऱ्यानी मोकळीच ठेवली होती. गावागावातून कुत्रेही दिसले नाही. पाकी अधिकाऱ्याना बाकी काही जरी कळले नाही तरी हे भविष्य मात्र चांगले कळले. भारतीय जवान सारी पाकी युद्धयंत्रणा नष्ट करीत आत घुसत होते.

शत्रूने ठिकठिकाणी पक्के खंदक तयार करून ठेवले होते. मशीनगन्सही आग ओकीत. पण शत्रूच्या खंदकात उड्या मारून त्याच्या मशीनगन्स बंद पाडणारे किती तरी साहसी कौशलराम भारतीय सेनेत होते. त्यामुळे ठिकठिकाणच्या शत्रूच्या अडथळ्याना व्यवस्थित तोंड देऊन जवान पुढेच सरकले.

जवान पुढे गेले खरे. पण त्यांना सारे लढाऊ साहित्य, जेवण, पाणी पुढे पोहचते करायला हवे. युद्धकाळात नेमकी हीच गोष्ट

अगदी महत्त्वाची असते. ही रसद सतत कायम राहावी लागते. त्यात जरा खंड पडला की युद्धाचे पारडे फिरलेच म्हणून समजा. रसद तोडण्यास शत्रू सतत टपलेला असतो. युद्ध खेळण्यापेक्षा रसद तोडणे सोईचे असते. त्यामुळे शत्रूची विमाने बुभुक्षितासारखी इकडे तिकडे हिंडत असतात. कोठे शिकार सापडते का याची वाट पाहत असतात.

राजस्तान आघाडीवरून ८ डिसेंबरला असाच रसद घेऊन लष्करी ट्रक्स्चा एक तांडा चाललेला होता. सगळा महत्त्वाचा दारूगोळा होता. तो वेळेवर जायला हवा होता. शत्रू येणार हे अपेक्षित धरून तांड्याच्या संरक्षणाची सारी व्यवस्था जय्यत ठेवलेली होती.

तांड्याबरोबर विमानविरोधी तोफ सुसज्ज होती. तिचे गोलंदाज होते निवृत्ती चवले. १९६५ च्या युद्धात ह्या रणमर्द मराठ्याने लक्षात राहील अशी कामगिरी केली होती. गनर चवले यांनी किती तरी पाकी विमाने अचूक पाडली होती. त्या वेळी त्यांच्याकडे अशीच रसद नेण्याची कामगिरी होती. पुढे पुढे तर त्यांचा इतका धसका पाकी विमानानी घेतला की त्या विशिष्ट क्षेत्रातून रसद चालली की पाकी विमाने येईनाशी झाली. त्यानी गनरचा धसका घेतला होता. नेमबाजीत पटाईत असलेला हा मराठा गडी लहानपणापासून अशा गोष्टीत सरावलेला होता. भाकरतुकडा घेऊन रानात गेले की छोटा निवृत्ती गलोलीने उडती पाखरे अचूक पाडीत असे. त्याच्याजवळ सतत गलोल असायची. खेड्यातील इतर मुलाना निवृत्तीच्या ह्या गलोलीची फार भीती वाटायची. कधी कुणाचा कपाळमोक्ष होईल याचा नेम नसायचा. आंब्यांच्या दिवसांत रस्त्यातील आंब्यांची झाडे कैऱ्यांनी बहरून

जायची. बाकीच्या मुलाना झाडावर चढावे लागे किंवा दगड व्हाणावे लागत. पण निवृत्ती झाडाखाली पडल्या पडल्या गलोलीने अचूक कैऱ्या पाडीत असे. बसल्या बसल्या कोठे तरी नेम धरून ती वस्तू तो बरोबर उडवीत असे. त्याच्या वरिष्ठानी ही गोष्ट हेरून त्याला 'गनर' केले होते. त्याचे ट्रेनिंग मिळाल्यावर तर तो अधिकच तयार झाला. १९६५ च्या युद्धात त्याला आपली कला दाखवायला वाव मिळाला. आकाशात संचार करणारे विमान खालून पाडणे हे म्हणावे तितके सोपे नाही.

रसद घेऊन जाणारा ट्रक्सचा तांडा पाकी विमानानी बरोबर हेरला. एक नाही दोन नाही एकदम सहा सेबरजेट्स घिरट्या घालू लागली. त्याना शिकार मिळाली होती. आशाळभुतासारखी ती विमाने खाली आली. सर्वांत पुढे जे विमान होते त्यावर चवलेनी अचूक नेमबाजी केली. पण त्या विमानाने मशीनगनने गनर चवल्यांवर गोळ्यांचा वर्षाव केला.

गोलंदाज चवल्याना अशा वर्षावाची चांगलीच संवय होती. ते तसूभरही हलले नाहीत. पाहता पाहता एक गोळी त्यांच्या छातीत घुसली. त्यांनी छातीचा कोट केला होता. त्यांना त्या गोळीची भीती कसली. त्यांनी आपल्याच हाताने जरा टोकरून गोळी पटकन् बाहेर काढली. रक्ताची चिळकांडी एकदम उडाली. पुन्हा रक्त त्यांच्या कपड्यावर झिरपू लागले. त्यांचा हात रक्ताने माखला. तसाच त्या तोफेलाही लागला.

त्यांना जणू त्या तोफेला म्हणायचं होतं, 'अगं, माझं रक्त मी तुला लावलं की ! वये, आता शत्रूच्या नरडीचा घोट घे !'

गनर चवलेनी आपल्या जखमेकडे न पाहता तोफ डागायला आरंभ केला. वेळ लावून उपयोग नव्हता. बाँब टाकण्यासाठी खाली

झेपावलेले सेबरजेट त्यानी अचूक खाली पाडले ! एक धूड पाहता पाहता कोसळले ! बाकीची सेबरजेट एकदम जरा दूर झेपावली. पण एकाने जाता जाता गनर चवल्यांवर गोळ्या झाडल्या. त्यातील आणखी एक गोळी त्यांना लागली. पण त्याची त्यांना फिकीर नव्हती. गोळी कुठं लागली हे पाहण्यास देखील त्यांना वेळ नव्हता. रक्ताची धार सुरू झाली. ते रक्ताने न्हाऊन निघाले.

पुन्हा सेबरजेट्स खाली झेपावू लागली. त्याना हल्ला करण्यास अजून वाव मिळाला नव्हता. त्यानी तीनदा प्रयत्न करून पाहिला होता, पण त्यांचा बेत प्रत्येक वेळी हाणून पाडण्यात आलेला होता. जेवणाचे ताट समोर दिसावे पण हात बांधलेले असावेत ! पाकी विमानांचे तसेच झाले. शत्रूची रसद चालली होती, पण त्याना ती उडविता येत नव्हती.

एक जरा खाली आले रे आले की तुफानी गोलंदाज निवृत्ती चवलेनी ते पाहता पाहता खाली पाडले ! दोन सेबरजेट्सचा निकाल लागलेला पाहून उरलेली चारी सेबरजेट्स पिसाट पळून गेली. भित्रे ! भेकड ! ते जर जिद्दीचे असते, तर पळाले नसते.

केवळ निवृत्ती चवले गोलंदाज होते म्हणून ट्रक्सचा तो ताफा सुरक्षित राहिला. वाचला. नाही तर सहा सैतानानी ट्रकन् ट्रक उध्वस्त केला असता. सारी रसद वाटेतच खलास झाली असती. गनर चवलेनी आपली कर्तबगारी दाखविली होती.

विमाने जाताच त्याना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्या जखमातून भयंकर रक्त गेल्यामुळे त्याना एकदम थकवा आलेला होता. त्यांच्या शरीरात घुसलेली गोळी बाहेर काढल्यानंतर डॉक्टर बँडेज बांधीत होते.

"डॉक्टर," गनर चवले म्हणाले, "मला आता इथं झोपवून ठेवू नका !"

"का ?" डॉक्टरनी हसत विचारले.

"मला बाकीची विमाने पाडायचीत." गनर चवले म्हणाले, "मला विमाने पाडू द्या. लवकर लवकर पट्टी बांधा. मला सोडा."

ही जिद्द, हा उत्साह, ही उमेद, ही कर्तव्यतत्परता दुर्मिळ आहे. गनर चवले यांच्यासारखे जवान म्हणजे ह्या देशाचे परम-भाग्य होय. हेच खरे भारतभाग्यविधाते !

* * * *

# ३. श्रीनगरचा बाजी प्रभू देशपांडे



श्रीनगरचा विमानतळ. ३ डिसेंबरचा दिवस. संध्याकाळच्या सुमारास एकाएकी हवाई हल्ला सूचित करणारे भोंगे वाजू लागले. सगळीकडे धावपळ सुरू झाली. हवाई हल्ल्याची प्रात्यक्षिके अलीकडे खूप झालेली होती. त्यामुळे श्रीनगरच्या लोकाना सवय झालेली होती. विमानतळावर तातडीने सारी दक्षता घेण्यात आली. सारे जण निवाऱ्याला पळाले. राहिला एकटा अरुमुगम. त्याला कुठे हलता येत नव्हते. त्याच्यावरच सारी भिस्त होती.

अरुमुगम गनर होता. होय, विमानवेधी तोफेचा गनर होता. आपल्या गनवरती त्याचा विलक्षण विश्वास होता. त्याच्यावरच श्रीनगरच्या त्या विमानतळाचे भवितव्य अवलंबून होते. पण कुणाला काही काळजी नव्हती. अरुमुगमवर सगळ्यांचा भरंवसा होता.

पाकी विमाने श्रीनगरच्या विमानतळाच्या कक्षेत येताच अरुमुगमच्या कार्याला आरंभ झाला. चार सेबरजेट हल्ला करण्यासाठी येत होती. विमानभेदी तोफेचे दणके पाहताच ती जरा पांगली. एकदम बाजूला गेली. लांबून घिरट्या घालू लागली. त्यांच्या भयानक आवाजाने सारे श्रीनगर दणाणून गेले. गनर अरुमुगम समोरच होता. एक चुकार सेबरजेट पाहता पाहता जवळ आले व काही बाँब टाकून गेले. त्याच्या शेपटीवर अरुमुगमचा दणका बसलाच. बाकीची तशीच पळाली.

सेबरजेट्स आली तशी निघून गेली. ती गेल्याचा पुन्हा भोंगा झाला. श्रीनगर सुटले. ही किमया होती अरुमुगमची. त्याच्या अचूक दणक्याची.

याह्यासुराने ‘ इस्रायली ’ पद्धतीने हवाई हल्ला करण्याचे योजिले होते. त्याची अशी कल्पना की सारे भारतीय हवाई दल सावध नसताना एकदम सगळीकडे पिसाट हल्ला करून खलास करून टाकायचे. म्हणून त्याने ३ डिसेंबरला संध्याकाळी भारतातील बारा प्रमुख लष्करी विमानतळांवर हल्ले केले. त्यांच्या कल्पनेप्रमाणे भारतीय हवाईदल निद्रिस्त नव्हते. कारण त्यानेच दहा दिवसांपूर्वी युद्धाची धमकी दिली होती. ती खरी धरून भारतात प्रत्युत्तराची सारी तयारी करण्यात आलेली होती. विमानतळावरची विमाने सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आली होती. अचानक हवाई हल्ला झाला तर त्याला तोंड देण्याची सारी तयारी परिपूर्ण होती. जे श्रीनगरला घडले तेच सगळीकडे घडले. कुठेही काहीही नुकसान झाले नाही. उलट दुसऱ्या दिवशी जेव्हा भारतीय विमाने पाकी हद्दीत घुसली तेव्हा सारे पाकिस्तान भाजून पोळून काढले. एकही विमानतळ धड ठेवला नाही. पाकी गनर्सना

एकही भारतीय विमान पाडता आले नाही. भारतीय विमानानी शेकडो हल्ले केले. कळ पाकिस्तानने काढली होती. आता त्याची फळे तो भोगू लागला होता. लष्करी दृष्टया महत्त्वाचे भारतीय विमानानी काहीही शिल्लक ठेवले नाही.

यामुळे चिडून पाकी विमाने पुन्हा दुसऱ्या दिवशी श्रीनगरवर आली. याह्याखान व त्याच्या पूर्वजांचा काश्मीरवर पहिल्यापासून डोळा होता. भारताची ही गुलाबी शान त्यांच्या राक्षसी डोळ्याना पाहवत नव्हती. सौंदर्याची ती खाण त्याना हवी होती. काश्मीरची ती बर्फाळ शिखरे, ती मनमोहक सरोवरे, तेथील त्या जगप्रसिद्ध बागा त्याना पाहवत नव्हत्या. म्हणूनच स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर तीन महिन्यातच त्यानी काश्मीरवर पहिले आक्रमण केले ! अजिबात दम धरवला नाही. १९६५ मध्ये जगभर बेअब्रू झाली तरी खोड गेलेली नव्हती. भारतावर भुंकून भुंकून अयूब लयाला गेला. आता याह्यासुर जाणार होता.

श्रीनगरच्या विमानतळावर विमाने घिरटया घालू लागताच हवाई हल्ल्याचे भोंगे वाजू लागले. गनर अरुमुगमची कामगिरी सुरू झाली. त्याने आपली विमानवेधी तोफ कुरवाळली.

" तुला काल बळी मिळाला नाही." अरुमुगम म्हणाला, " आज देतो. काळजी करू नकोस. अशी तुटून पड की सैतान पुन्हा फिरकता कामा नयेत."

गनर अरुमुगम्ची तोफ सुरू झाली. तीन सेबरजेट विमानतळावर झेपावू पाहत होती. तोफेचा अचूक मारा चालू होताच, ती जरा बावरली.

धिटाईने एक जरा खाली आले व धावपट्टीवर बाँब टाकण्याचा प्रयत्न करू लागले. गनर अरुमुगमने त्याला अजून थोडे खाली येऊ

दिले. नेम धरला. असा पिसाट गोळा सुटला की त्याने त्या विमानाचा बरोबर भेद केला. विमान हवेतल्या हवेत जरा वेडेवाकडे झाले. गोळ्याने काम झाले होते. विमान पेटले. पाहता पाहता सेबरजेटचे आगडबंब धूड खाली कोसळले. आगीचा गदारोळ उठला. दुसरे भेकड सेबरजेट जीव घेऊन पळत सुटले. विमानतळ मोकळा झाला. धोका संपला. गनर अरुमुगम्‌ने आज आपले कर्तव्य चोख बजावले होते.

पाकी सैनिकानी तो धसका इतका घेतला की, दुसऱ्या दिवशी ते श्रीनगरला फिरकलेच नाहीत. आदल्या दिवशीचा चमत्कार त्यानी ऐकला होता. आपला बाप त्या ठिकाणी हजर आहे हे त्याना कळून चुकले.

त्यानंतर तिसऱ्या दिवशी अगदी संध्याकाळ होताना चार विमाने पुन्हा आली, ती काही तरी योजना करून आली असावीत. त्याना सूड घ्यायचा होता. तो वचपा त्याना आता काढायचा होता. त्यांना आज दुसरे-तिसरे काहीही दिसणार नव्हते. त्याना हवा होता गनर ! भारतीय गनर अरुमुगम !

चारी सेबरजेट पिसाटासारखी एकदम खाली आली. एक तर जिवाचा करार करून इतक्या खाली आले की कोसळते की काय असे वाटावे. गनर अरुमुगमची कारवाई चालू झालेली होती. पण त्याला न भिता जे सेबरझेट खाली आले त्याने मशीनगनने अरुमुगमवर अचूक मारा केला. त्याच्या डोक्यात गोळ्या घुसल्या. त्याला प्राणांतिक वेदना होऊ लागल्या. पण त्याने काम थांबविले नाही. आता उलट तो हट्टाला पेटला. मृत्यू त्याच्याभोवती फेऱ्या मारीत होता. आपले भविष्य त्याला कळून चुकले होते. म्हणूनच ह्या जगाचा निरोप घेताना त्याला कर्तव्यपूर्तीचं समाधान हवं होतं. जे समाधान विशाळगडच्या पावनखिंडीत बाजी प्रभू देशपांड्यांना

मिळाले, जे समाधान पुण्याच्या गणेशखिडीत चाफेकर बंधूंना मिळाले, जे समाधान सरदार भगतसिंगांना मिळाले.

गनर अरुमुगमने अचूक गोळा सोडला. त्याला गोळी मारणारा सैतान त्याने हेरला होता. त्या विमानापाठोपाठच त्याची गनही फिरत होती. अरुमुगमही नागाची जात होती. त्याच्या वाटेला कोणी गेला की तो खलासच व्हायचा. त्या पाकी सैतानाने धाडस केले होते. आता त्याची फळे त्याला मिळणार होती. त्या पिसाट गोळ्याने असा काही दणका त्या सेबरजेटला दिला की तो राक्षस झपाट्याने पेटत खाली कोसळला.फुटला.तुटला.प्रचंड स्फोट झाला. ज्याने अरुमुगमला गोळ्या मारल्या त्या सैतानाचे हाडही शिल्लक राहिले नसेल !


त्या विमानाच्या प्रचंड आगीचा प्रकाश अरुमुगमच्या चेहऱ्यावर पडताच त्याला कर्तव्यपूर्तीचं समाधान लाभलं. गनर अरुमुगम कोसळला. बाकीची विमाने पळून गेली.

गनर अरुमुगमची प्राणज्योत मालवली, एका आगळ्या समाधानात. स्वर्गाचे दार त्याला मोकळे झाले. श्रीनगरचा विमानतळ त्याच्या बलिदानाने पवित्र झाला. त्या विमानतळाने एक विलक्षण पराक्रम पाहिला होता. रक्ताने न्हाऊन निघालेला गनर आपले कर्तव्य बजावीत होता. त्याने जर आपली गन ऐन वेळी टाकली असती तर श्रीनगरचे अस्तित्व धोक्यात आले असते. विमानतळाची राखरांगोळी झाली असती. ती जाणीव गनर अरुमुगमला होती.

गनर अरुमुगम अमर झाला. त्याचा तो महान पराक्रम त्याला 'वीरचक्र' मिळवून देण्यात यशस्वी झाला.

पण आपला मरणोत्तर झालेला बहुमान पाहण्यास तो आज आपल्यात नाही. श्रीनगरच्या परिसरात विलीन झालेला त्याचा आत्मा ह्यामुळे निश्चित सुखावला असेल ! * * * *

# ४. ठाणे परत घेतले!



युद्ध हा अखेर जुगार आहे. काळ वेळ पाहून प्रत्येक निर्णय घ्यावा लागतो. काल केलेली युक्ती आज पुन्हा उपयोगी पडेलच असे नाही. पण काही वेळा शक्तीपेक्षा युक्तीही श्रेष्ठ ठरते. जुन्या अशा किती तरी गोष्टी आपल्याला माहीत आहेत. प्रसंगानुरूप काही वेळा वागावे लागते. १९६५ च्या युद्धातही पाकिस्तानची तयारी ह्या युद्धाप्रमाणे जबरदस्त होती. भरपूर दारूगोळा, उदंड शस्त्रे, प्रचंड मनुष्यबळ हे पाकिस्तानी वैशिष्ठ्य. त्या विरुद्ध भारतीय परिस्थिती.

भारताला अमेरिका किंवा चीनसारखे मित्र नसतील. पॅटन किंवा सेबरजेट्स नसतील. पण आहेत जिद्दीचे जवान. महान पराक्रमी, महान ध्येयवादी. तळहातावर शिर घेऊन लढणारे. पंचप्राणांची कुरवंडी करणारे.

आपला दगाबाज शेजारी व त्याची लोभी वृत्ती पाहून भारताला आपली सीमा सतत जागृत ठेवावी लागत आहे. काश्मीरसारख्या ठिकाणी तर फुटाफुटावर, जवान उभे आहेत. सीमासुरक्षादलाच्या ताब्यात भारतीय सीमा सुरक्षित आहे. ह्या दलाचे जागृत जवान रात्रंदिवस तेथे उभे आहेत.

फ़िरोजपूर भागातील ‘मामदोत’ हे असेच एक भारतीय ठाणे. अगदी सीमेजवळ. इन्स्पेक्टर आर. के. वाधवा व त्यांचे जवान तेथे पहारा करीत होते. ‘बांगला’चा प्रश्न निर्माण झाल्यापासून व पूर्व पाकिस्तानात मुक्तिवाहिनीचा जोर वाढल्यापासून सीमेवरील बंदोबस्त वाढलेला होता. सर्व सेना सीमेजवळ खडी होती. फक्त हुकुमाची वाट पाहत होती.

तीन डिसेंबरच्या निर्लज्ज हवाई आक्रमणानंतर ती वाढली. सारी सीमा जागृत राहिली! “साब,” एक जवान इन्स्पेक्टर वाधवाना म्हणाला, “दुष्मन हमला कर रहा है, हमारे एरोड्रम्स-पर।” “मैने सुना है रेडिओ।” इन्स्पे. वाधवा म्हणाले, “आज की रात खतरनाक है, न जाने क्या होगा ? लेकिन डरनेकी कोई बात नहीं, हम तैय्यार है।”

“दुष्मनको खदेड देंगे.”

“हां, खदेड देंगे.”

इन्स्पेक्टर वाधवांनी सर्व सीमा-रक्षकाना सूचना दिल्या. सीमेवरील सर्व ठिकाणी खळबळ उठली होती. पुढील भविष्य प्रत्येकाला कळून चुकले होते. प्रश्न होता आता कृतीचा. याह्याखान उतावळी करणार यात शंका नव्हती.

‘मामदोत’ ठाणे फिरोजपूर भागातील एक महत्त्वाचे ठाणे होते. मध्यरात्रीनंतर एकदम पाकी हल्ला झाला. पाकिस्तानच्या

बलुची रेजिमेंटचे दोनशे सैनिक ' मामदोत 'वर तुटून पडले. चिनी तंत्र वापरून त्यानी एकदम माणसे घुसविली होती. १९६२ मध्ये चीनने ज्या तऱ्हेने हल्ला केलेला होता. तोच प्रकार येथे झालेला होता. त्याच दिवशी पाकी विमानानी इस्रायली तंत्र वापरले होते.

इन्स्पेक्टर वाधवांचा नाईलाज झाला. त्या बलुचीना तोंड देण्या-इतके मनुष्यबळ त्या वेळी तेथे नव्हते. मनुष्यहानि टाळणे भाग होते. त्यानी माघार घेण्याचे ठरविले. ठाणे सोडले. सोडणे भागच होते. तसा आदेशही मिळाला होता. तो त्यानी पाळला. प्रमुख ठाण्याला त्यानी सर्व परिस्थिती कळविली होती. त्याना लगेच माघार घेण्याचा सल्ला मिळाला होता. ठाणे सोडताना त्यांना फार वाईट वाटले.

त्यांच्या मनात नसतांना ठाणे सोडावे लागले. हा त्याना कमी-पणा होता. हे शूरत्वाचे लक्षण नव्हते. त्यांच्या आजपर्यंतच्या बाण्याविरुद्ध हे कृत्य झाले होते. सीमा सुरक्षादलात ते दाखल झाल्यापासून असे कधी घडले नव्हते. युद्ध जरी चालू नसायचे तरी सीमेवर सतत कटकट असावयाचीच. याह्यासुराचे नराधम गप्प बसत नसत. सीमेवर सतत त्यांचा गोळीबार चालू असायचा. काही वेळा त्यांचा तोफखानादेखील आग ओकायचा. अशा सर्व प्रसंगाना त्यानी खंबीरपणे तोंड आजपर्यंत दिले होते. कधी पाकी गनीम आत घुसू दिले नव्हते. हाकलून लावले होते. गोळ्यांना गोळ्यांनीच उत्तर दिले होते.

मध्यरात्रीच्या काळोखात ठाणे सोडल्यामुळे ते पाठीमागे सरले. मागे जरा झाडी होती. त्या झाडीत एक जंगली जातीचे मोठे झाड होते. त्याचा विस्तार खूप होता. नेहमी त्याच्या खाली दाट सावली असायची. त्या सावलीत ते किती तरी वेळा बसावयाचे.

विचार करायचे. त्या वृक्षाला सीमेवरच्या सुखदुःखाच्या साऱ्या कथा माहीत होत्या. त्या रात्री दुःखी झालेले इन्स्पेक्टर वाधवा तेथेच येऊन बसले. काही जवानही पलीकडे बसले. आता काही तरी करायला हवे होते. गेलेले ठाणे परत मिळवायला हवे होते. अपयशाचा कलंक धुऊन काढायला हवा होता. सकाळ होण्याच्या आत सारे व्हायला हवे होते. रात्रीचा हा कलंक सकाळी उरता कामा नये. शाळेत शिकलेली ब्रूसची गोष्ट त्याना आठवली. पराभवाने खचून हताश होऊन तो एकदा आढ्याकडे पाहत झोपला. एक कोळी आढ्यावर जाळे विणीत होता. तो एकदम खाली पडला. पुन्हा तो वर गेला. जाळे विणू लागला. असे पाच वेळा झाले. सहाव्यांदा मात्र तो पडला नाही. आपल्या कार्यात यशस्वी झाला. ब्रूस राजा उठला. त्याने युद्धाची पुन्हा तयारी केली. शत्रूवर तुटून पडला. विजयी झाला. आपल्याला तर फक्त माघार घ्यावी लागली आहे. आपला पराभव कुठं झालाय् ? मग पुन्हा प्रयत्न करण्यास काय हरकत आहे ? नाही तरी आपले कर्तव्य काय आहे ? बस्स ! ठरले. पुन्हा प्रयत्न करायचा. शत्रू प्रचंड आहे. असेल. आपली संख्या कमी आहे. असेल. मराठ्यांनी औरंगजेबाला कसा धडा शिकविला ? शक्तीच्या नव्हे युक्तीच्या जोरावर. युक्ती केली पाहिजे. शत्रू पळपुट्या जातीचा आहे. त्याला पळवून लावण्यासाठी काही तरी केले पाहिजे. त्याला घाबरवून सोडले पाहिजे. त्यानी ठरविले. एक युक्ति त्यांना सुचली. ते हसले.

त्यांनी आपले पराक्रमी जवान गोळा केले. त्याना सारी योजना सांगितली. सगळ्याना हसू आले. हा एक प्रयत्नच होता. पण सगळ्याना मान्य झाला. अंधाऱ्या काळोखाचा ते फायदा घेणार

होते. ते एकूण पंधराजण होते. पाच पाचच्या तीन तुकड्या केल्या. तीन दिशांना तिघे उभे राहिले. एका तुकडीत स्वत: इन्स्पेक्टर वाधवा उभे राहिले.

प्रत्येकाच्या हातात बंदुका होत्याच. काही क्षणातच त्या ठाण्याच्या तीन्ही बाजूला प्रचंड घोषणा सुरू झाल्या.

" सत श्री अकाल ऽ ! "

" जय भगवान् ऽ जय बलवान ऽ ! "

" हर ऽ हर ऽ महादेव ऽ ! "

आलटून पालटून घोषणा इतक्या वाढल्या की विचारायची सोय नाही. रात्रीच्या नीरव शांततेत आवाज फारच घुमू लागले.

" भारतमाता की जय ऽ "

" इंदिरा ऽ गांधी की जय ऽ "

पुन्हा गर्जना चालू झाल्या. गगनभेदी घोषणा. सारा परिसर दुमदुमून निघाला.

" हर ऽ हर ऽ महा ऽ देव ऽ ऽ "

" सत श्री अकाल ऽ "

" जय भग ऽ वा ऽ न ऽ जय बलवान ऽ "

पाकी ठाण्यात गडबड उडाली. थरकाप उडाला. त्यांची कल्पना अशी झाली की प्रचंड भारतीय सेना गोळा झालेली आहे. मराठा, जाट व शीख कंपन्या गोळा होत आहेत. असे शत्रूला वाटले.

इन्स्पेक्टर वाधवांनी आता घोषणा करीत एकदम सगळ्यांना गोळ्या झाडण्यास सांगितले. गोळ्यांचा वर्षाव व घोषणांचा दणका होताच पाकी पळपुटे पटापट पळू लागले. दारूगोळा टाकून, बंदुका टाकून पळत सुटले. काही जवान ठाण्यात घुसले. त्यांनी काही हातबाँब उचलले. त्यांचेच हातबाँब उचलून त्यांच्या-

वर टाकण्यास आरंभ केला. त्यांच्या पाठोपाठ लांबपर्यंत जाऊन त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. किती तरी पळपुटे मरून पडले. दोनशे गनिमांपैकी सारे पिसाट पळाले. एकालाही प्रतिकार करावासा वाटला नाही. निदान मशिनगन चालू करावी असा विचारही कुणाला सुचला नाही.

ठाणे मोकळे झाले. भारतीय जवानानी पुन्हा गगनभेदी घोषणा केल्या.

ठाण्यात प्रचंड दारूगोळा सापडला. त्यांच्याच मशिनगन्स गनीमांच्या दिशेला लावून ठेवल्या. अधून-मधून त्यांच्या फैरी चालू ठेवल्या. एखाद-दुसरा टेहळ्या आला तरी टिपला जावा.

सकाळ झाली. पाकी पळपुट्यांची प्रेते सर्वत्र विखुरलेली दिसत होती. ती बलुच्यानी ओढून देखील नेली नव्हती. त्यांच्या बंदुकाही वाटेत पडल्या होत्या. त्या साऱ्या उचलून आणल्या.

इन्स्पेक्टर वाधवानी केवळ पंधरा जवानांच्या जोरावर प्रचंड पराक्रम केला होता. एकही जवान कामी आला नव्हता. उलट शत्रूचे प्रचंड रणसाहित्य सांपडले होते.

'सामदोत' ठाणे आहे त्या स्वरूपातच सकाळी शोभत होते. रात्री हे शत्रूने बळकावले होते. ते पुन्हा जिंकून घ्यावे लागले. हे सारे रात्रीत घडले. काळोखाला साक्ष ठेवून झालेला पराजय सावरला गेला होता.

शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ आहे हे इन्स्पेक्टर वाधवानी पटवून दिले होते.

शाबास वाधवा ! तुमच्या कौशल्याची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. पराजयाने खचून न जाता तुम्ही प्रयत्नाने ठाणे जिंकले! तुमचे धैर्य व नेतृत्व अचाट आहे !

* * * *

# ५. मी वचनाला जागलो !



१९६५ मध्ये 'खेमकरण' साऱ्या जगाला माहीत झाले. पॅटनची दफनभूमी झाली ती. एका पाठोपाठ रोरावत येणारे पॅटन तेथे एका पाठोपाठ गाडले गेले. साऱ्या खेमकरणमध्ये मृत पॅटन्सची कलेवरे आकाशाकडे आऽऽ करून अस्ताव्यस्त पडलेली होती.

याच खेमकरण भागाजवळ याह्यासुराने प्रचंड सेना तयार ठेवली होती. मागील कलंक कदाचित धुवून काढावा अशी त्याची गोड कल्पना असेल. लाहोरच्या परिसरात काढलेला 'इच्छोगिल' कालवा व त्याचे जाळे खंदकासारखे त्याला उपयोगी पडत होते. तो कालवा बांधताना त्याचा पाण्याच्या उपयोगापेक्षा त्याच्या-मागे संरक्षणाचाच अधिक हेतू असला पाहिजे हे आपल्याला १९६५ मध्ये समजले. त्याच्या 'पिलबॉक्सेस' जशा आपल्याला समजल्या नव्हत्या तसाच हा कालवा.

खेमकरण भागातून भारतालाही शत्रूच्या मुलुखात मुसंडी मारायची होती. संरक्षणमंत्री बाबू जगजीवनराम ह्यांनी पूर्वीच जाहीर केले होते. “युद्ध याह्याखानाना हवे असेल तर जरूर होईल. पण त्यानी हे पक्के लक्षात ठेवावे की ते त्यांच्याच मुलुखात होईल.” त्यामुळे युद्धाला प्रारंभ होताच भारतीय सेना ठिक-ठिकाणाहून मोठ्या प्रमाणांत पाकी हद्दीत शिरू लागल्या. मुसंडी मारू लागल्या.

खेमकरणजवळील ‘ शहजरा ’ हे पाकी खेडे आपल्याला जिंकायला हवे होते. ते खेडे जिंकल्याशिवाय भारतीय जवान पुढे सरकू शकत नव्हते. त्या खेडयाजवळून प्रचंड कालवा वाहत होता. त्याचा खंदकासारखा शत्रूला उपयोग होत होता. शत्रूने शहजराच्या घराघरातून मोर्चे स्थापन केलेले होते. सीमेलगतची सारी खेडी याच हेतूने मोकळी केलेली होती. कालव्याच्या त्या तीरावरून मशीनगन्सचा मारा चालू होता. त्यामुळे कालवा ओलांडून जाणे प्रथम आवश्यक होते. मग शत्रूच्या आग ओकणाऱ्या त्या उद्दाम मशिनगन्स बंद पाडायला हव्या होत्या. तोपर्यंत शत्रू काही सारे पाहत बसणार नव्हता. म्हणजे ‘ शहजरा ’ उठविणे सोपे नव्हते. शत्रू अतिशय सावध होता. त्याच्या हालचाली योजनाबद्ध होत्या. सुरक्षित होत्या.

कालवा ओलांडून शत्रूच्या मशीनसगन्स बंद पाडण्याची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यानी नायब सुभेदार गणेश व त्याच्या सहकाऱ्यांवर सोपविली. नायब सुभेदार गणेशनी १९६५ मध्यें अशाच महत्त्वाच्या कामगिऱ्या पार पाडल्या होत्या. प्राणाची पर्वा न करता शत्रूच्या गोटात शिरून शत्रूला पळवून लावले होते. त्या वेळी ते भयंकर जखमी झाले होते. केवळ योगायोगाने वाचले.

किती तरी दिवस हॉस्पिटलमध्ये त्याना पडून राहावे लागले होते.

"डॉक्टर" सुभेदार गणेश रोज विचारायचे,

"मी बरा होईन का ?"

"का ?"

"मला पुन्हा लढता आले पाहिजे" सुभेदार गणेश म्हणायचे,

"शत्रू बिन भरंवशाचा आहे. आज ना उद्या तो पुन्हा लढाई खेळणारच."

"जरूर लढा" डॉक्टर म्हणाले, म्हणून तर आम्ही तुमची काळजी घेत आहोत. वास्तविक तुमचा पाय कापावा लागला असता. पण ऑपरेशन करून आम्ही एक धोका पत्करला. योगायोगाने जमले. पाय कापला असता तर तुम्हांला घरी बसावे लागले असते."

"डॉक्टर ! डॉक्टर" सुभेदार गणेश म्हणाले. "तुम्ही केवढे उपकार करून ठेवले आहेत माझ्यावर. पाय जर कापला असता तर मी लढू शकलो नसतो. तसे जगण्यापेक्षा मी गोळी मारून घेतली असती."

अशा जिद्दीच्या नायब सुभेदार गणेशाना जेव्हा वरिष्ठानी 'शहजरा' पाडण्याची कामगिरी सोपविली तेव्हा त्याना मनस्वी आनंद झाला. त्यांना योजना मिळाली. शहजऱ्याच्या दक्षिणेकडील भागात एका तुकडीचे नायब सुभेदार गणेश नेतृत्व करीत होते.

आता प्रथम त्याना कालवा पोहून पलीकडच्या तीरावर जायचे होते. पोहून जाताना बरोबर बंदुकाही विशिष्ट तऱ्हेने उचलून न्यावयाच्या होत्या. नायब सुभेदार गणेशानी आपल्या सहकाऱ्याना सूचना दिल्या. भारतमातेचा जयजयकार करीत सर्वांनी पाण्यात उड्या मारल्या ! जिवावर उदार झालेले रणवीर रणांगणाकडे

निघाले. त्याना कशाचीही भीती नव्हती. शत्रूची संरक्षण फळी फोडायची होती. शत्रूची अशी कल्पना की इतका प्रचंड कालवा ओलांडून भारतीय जवान कसले येणार !

नायब सुभेदार गणेश व त्यांचे रणझुंजार रणमर्द कालव्यातून निघाले. शत्रूच्या गोटात ‘ कालवा ’ उठला ! भारतीय जवान निघाले. पाण्यातूनही निघाले. कालवा पार होण्याच्या वेळी जेव्हा ते पलीकडच्या किनाऱ्याकडे पोहोचू लागले तेव्हा पाकी शेंदाड शिपायांचे धाबे दणाणू लागले ! ते कमी व्हावे म्हणून त्यांच्या मशीनगन दणाणू लागल्या. पाण्यातून येणाऱ्या भारतीय जवानांवर त्यांनी मशीनगन्स गोळ्यांचा वर्षाव सुरू केला !

आपले हे असे स्वागत होणार याची त्या सर्वांना कल्पना होतीच. ते सावध होते. गोळ्यांचा ‘ खुराक ’ चुकवीत चुकवीत ते निघाले. नायब सुभेदार गणेश सगळ्यांच्या पुढे होते. भराभर पाणी कापीत ते चालले. लहानपणापासून ते पोहण्यांत पट्टीचे वाकबगार होते. शाळेत असताना तर पोहण्याच्या किती तरी शर्यतीत त्यांनी पहिले क्रमांक पटकाविले होते. गांवच्या नदीला महापूर आला की गावातील जे काही धाडशी तरुण पाण्यांत उड्या मारायचे त्यात नायब सुभेदार गणेशही असायचे. पाण्याचे लोंढे पाहून लोकांच्या नजरा देखील भयभीत व्हावयाच्या. पण त्या धाडशी तरुणाना त्याचे काही वाटायचे नाही. आता हा कालवा तर अगदीच किरकोळ. त्यामुळे नायब सुभेदार गणेश सगळ्यात पुढे होते.

किनाऱ्यावर उतरताच आपली स्टेनगन सावरून ते पळत सुटले. शत्रूच्या मोर्च्यावर. मशीनगन्सच्या खाईतून. एक इंचहि

जागा मोकळी नव्हती. सारा किनारा भाजून पोळून निघत होता. पण आता त्याना कशाची पर्वा नव्हती. साक्षात मृत्यूच त्यांच्या अंगात संचारला होता. मग ते कुणाला भिणार? कसली भीती. माणूस घाबरतो मरणाला. जवान घाबरतो पराजयाला.

शत्रूच्या मोर्चाजवळ जाऊन तेथे त्यानी स्टेनगन्सचा मारा चालू केला. शत्रूच्या गोळ्या खाऊन त्यांच्या अंगाची चाळणी झाली. पण त्याना त्याचे काहीच वाटत नव्हते. खंदकातील सैतान त्याना यमसदनाला पाठवायचे होते. तेवढ्यांत त्यांच्या जोडीला नाईक नरेंद्र बहाद्दूर राणा आला. त्यानेही आपल्या स्टेनगन-मधून गनीम टिपण्यास आरंभ केला. त्याच्या पाठोपाठ सारे जवान गोळ्या अंगावर झेलीत झेलीत शत्रूच्या मोर्च्यावरच तुटून पडले! आगीची भीती लांब असणाराना! आगीतच उडी मारणाराना काय त्याचे? 'भारतीय जवान' वेगळे आहेत. होय खरोखरच जगा-वेगळे आहेत. दिलेली कामगिरी पूर्ण करण्यासाठी आपल्या छातीचा कोट करण्यास कधीच मागेपुढे ते पाहत नाहीत. जितके काम संकटाचे तितके ते अगोदर हाती घेतात. आपल्या जिवावर ही कामगिरी बेतणार आहे याचा विचार ते कधीच करणार नाहीत. म्हणूनच हे भारतीय जवाना! मृत्यूही तुला पाहून चळचळा कापतो!

नायब सुभेदार गणेश व त्यांचे सारे जवान मोर्च्यावरच जर तुटून पडले तर याह्यासुराचे बहादूर दुसरे काय करणार? खंदकातील ते सैतान ठार होताच बाकीचे शूर पाकी सैन्य पळत सुटले. दारुगोळा टाकून पळत सुटले. भारतीय जवानांनी पाठलाग करून कितीतरी पळपुट्याना "या ऽ अल्ला ऽ" करण्यास लावले!

'शहजरा' मोकळे झाले ! घराघरात लपून बसलेले पाकी नरवीर भारतीय जवानानी 'टिपून' काढले. वाट मोकळी झाली. आता भारतीय जवान पुढे मुसंडी मारतील.

पण त्याना आठवतील नायब सुभेदार गणेश. ज्यांच्यामुळे हा मार्ग मोकळा झाला ते नायब सुभेदार गणेश. ज्यानी आपल्या पंच-प्राणाची कुरवंडी करून 'शहजरा' मुक्त केले ते नायब सुभेदार गणेश !

खरं आहे. 'शहजरा' मुक्त होताच. नायब सुभेदार गणेशानी हसत हसत प्राण सोडला. त्यांच्या अंगाची चाळणी झाली होती. ते रक्ताने न्हालेले होते. पण वाट पाहत होते 'शहजरा' पडण्याची.

भारतीय जवानानी तेथे विजयी तिरंगा फडकावला व घोषणा केली. "नायब सुभेदार गणेश की जयऽ" "भारत माताऽ की जय"

ही घोषणा कानात घुमतांच त्यानी देहाचे बंधन नष्ट केले.

"मी वचनाला जागलोऽ"

"मी वचनाला जागऽलोऽ..."

"मी वचनालाऽ..."

नायब सुभेदार गणेशानी शेवटचे शब्द उच्चारले. आवाज क्षीण होत गेला...! अखेरचा शब्द घुटमळला.

शहाजऱ्याचा हा महावीर चिरंजीव झाला. शत्रूच्या त्या कालव्यातील पाण्यानेही अश्रू ढाळले असतील. असला पराक्रम पाहण्याची त्याला सवय नव्हती.

नायब सुभेदार गणेश गेले. कर्तव्यपूर्तीचा आनंद मरताना त्याना निश्चीत झाला असेल. ह्या देशाची परंपरा त्यानी पाळली.

देश त्याना विसरणार नाही.

* * * *

# ६. वाऽरे शत्रू!



सीमा-संरक्षक दलातील सब इन्स्पेक्टर रामस्वरूप वास्तविक कुणाला कळलेही नसते. पण त्यानी केलेल्या अचाट पराक्रमामुळे ते सर्वांना ठाऊक झाले. रामस्वरूप अगदी दिसायचे साधे. हा भीमपराक्रम करील हे कुणाला खरेही वाटले नसते. पण संकट कोसळल्यावर त्यानी प्राणाची पर्वा न करता असामान्य पराक्रम करून दाखविला. एक भारतीय चिडीला पेटला म्हणजे काय करू शकतो त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रामस्वरूप.

सतलजच्या तीरावरील हुसेनीवाला ठाण्यावर ते व त्यांची तुकडी होती. सब इन्स्पेक्टर रामस्वरूपांवर आणखी एक जबाबदारी होती. हुतात्मा भगतसिंगाची पवित्र समाधी त्याच परिसरात आहे. याह्यासुराला व त्याच्या गणगोताला ती नेमकी पाहवत नव्हती. १९६५ मध्ये ही समाधी उध्वस्त करण्याचा शत्रूने वारंवार प्रयत्न केला होता. पण त्याला ते जमले नव्हते.

एकदा तर त्या वेळी शत्रूने त्या समाधीवर प्रचंड सैन्यानिशी आक्रमण केले. पण तेथे असलेल्या साठ जवानानी व दोन अधिकाऱ्यानी आपल्या प्राणांचे मोल देऊन समाधीला धक्का लावू दिला नाही.

आपण अशा जगप्रसिद्ध माणसाच्या पवित्र भूमीत संरक्षणाला आहोत याचा रामस्वरूपना फार अभिमान वाटायचा. सरदार भगतसिंगांच्या कार्याची व थोरपणाची त्याना चांगलीच माहिती होती. अशा थोर आत्म्याच्या समाधीचे संरक्षण करणे ही राष्ट्रीय जबाबदारी होती. ती त्यांना पार पाडायची होती.

तीन डिसेंबरच्या हवाई आक्रमणाची वार्ता ऐकताच ते सावध झाले होते. आज रात्री काही तरी गडबड होणार हे ते ओळखून होते. सर्वच सीमेवर विशेष जाग आलेली होती. सीमा संरक्षण दलाची कामगिरी आज मोलाची होती. अजून अधिकृत युद्ध सुरू झाले नव्हते. त्यामुळे सीमेलगत असलेल्या सेनेला हालचाल करता येत नव्हती.

रामस्वरूपानी आपले सहकारी साऱ्या परिसरांत पांगून ठेवले होते. शत्रू कदाचित जर दबत दबत एकेकटा आला तर त्याचा परस्पर बंदोबस्त करण्यास प्रत्येकाला सांगितले होते. तो जर एकदम घुसला असता तर मात्र काही इलाज नव्हता.

आणि झालेही तसेच. अंदाज घेण्यासाठीं एकादा गनीम हळूच अंधारातून मध्यरात्रीनंतर येऊ लागला. रामस्वरूपांचे साथीदार त्याचा निकाल लावू लागले.

फाटक्या अंगाचा एक गनीम अंधारात चाचपडत आला तो रामस्वरूपानाच धडकला. त्यानी पटकन त्याचा गळा दाबला. गनीमाने लगेच बंदूक टाकून गयावया करण्यास आरंभ केला. रामस्वरूपांच्या

मनांत एक गंमत आली. त्यानी त्याच्या बखोटयाला धरले व सतलजमध्ये नेले. तो जरा गडबड करू लागताच त्याच्या पाठीत असा एक दणका घातला की कुत्रे केंकाटल्यासारखे तो ओरडू लागला. जरा खोल पाण्यांत त्यानी त्याला नेले. पाण्यांत पालथे पाडले. त्याच्या अंगावर ते नाचू लागले. नाकातोंडात पाणी जाऊन काही क्षणातच तो खलास झाला. मुडदा दिसायला नको. सतलजच्या प्रवाहात तो वाहत गेला ! अजून चार पाच गनीम त्यानी ह्या युक्तीने सतलजमध्ये पाठविले. त्याना आता चेव आला.

हळूहळू त्यांची संख्या वाढू लागली. रामस्वरूपांच्या सहकाऱ्यानी आता बंदूकांच्या फैरी झाडण्यास प्रारंभ केला. सीमेपलीकडे किती सैतान होते कुणास ठाऊक. पण त्यानाही भारतीय ज़वानांचा अंदाज नव्हता. त्यामुळे सैतान एकदम हल्ला करण्याचे धाडस करीत नव्हते. पांच दहा पांच दहाच्या गटानी येऊ लागले. रामस्वरूपांचे सहकारी त्यांचा समाचार घेऊ लागताच ते पळू लागले.

खंदकातून त्यांचे जे जवान गोळीबार करीत होते. त्यांच्या गोळ्या संपल्या ! प्रमुख ठाणे तसे जवळ नव्हते. आता थांबून उपयोग नव्हता. खंदकाकडे धावणाऱ्या गनीमांवर त्यानी बंदुकीच्या दस्त्याने असे काही प्रहार केले की गनीमानी बंदुका टाकून पळण्यास आरंभ केला. रामस्वरूपानी गनीमांची एक बंदूक खंदकातील जवानाना दिली व एक स्वतःला घेतली. त्या गनीमांचा पाठलाग करून त्यांच्या बंदुकानी त्यानाच अल्ला घरी पाठविले. ते त्यांच्या पाठीमागे पळत गेले होते. एका झाडाखाली अजून तीन चार गनीम उभे होते. रामस्वरूपाना पाहताच ते

पळत सुटले. त्या झाडाखाली हातबाँबचा ढीग पडलेला होता.

रामस्वरूपानी आपल्या सहकाऱ्याना लगेच हाक मारली व त्यातील निम्म्यावर ढीग आपल्या ठाण्यावर पाठविला.

ते स्वतः तेथेच उभे राहिले व गनीमांच्या दिशेने हातबाँब टाकण्यास आरंभ केला. पलीकडे आता कुणी नाही याची खात्री झाल्यावरच ते आपल्या सीमेवर उभे राहिले.


सारे सैतान पळून गेले होते. वास्तविक दहापांच लोकांहून अधिक भारतीय जवान ठाण्यावर नव्हते. पण रामस्वरूपानी ज्या धाडसाने शत्रू पळवून लावले ते धाडस असामान्य होते. ठाण्यावर दारूगोळाही नव्हता. पण शत्रूला शेवटपर्यंत कसलाच अंदाज येऊ शकला नाहीं.

ही करामत होती सबइन्स्पेक्टर रामस्वरूपांची. केवळ युक्तीच्या जोरावर त्यानी गनीमांचा हल्ला परतवून लावला होता. त्यांच्याच बंदुका काढून घेऊन त्यांच्यावर हल्ला केला होता. त्यांचेच हातबाँब काबीज करून त्यांच्यावर फेकून त्याना पळवून लावले.

ज्या देशात असे निधड्या छातीचे वीर आहेत त्या देशाला कुणाची आहे भीती ?

* * * *

# ७. ते कर्तव्याला जागले!



भयानक तुंबळ युद्ध सुरू झालेले आहे. ज्या ईर्ष्येने याह्यासूर युद्धांगणात उतरला ती मावळू लागली आहे. एक छांब भाग सोडला तर सर्वत्र पाकिस्तानची पिछेहाट चालू झालेली आहे. भारतीय जवानांची मुसंडी आता कोणी आवरू शकणार नाही. भारतीय अधिकाऱ्यांनी ज्या काही महत्त्वाच्या आघाडया उघडल्या त्यांत सिंध आघाडी जोरदार होती. मध्यंतरी एकदा कच्छच्या रणात पाकी आक्रमण झालेलं होतं. त्यानंतर १९६५ च्या युद्धातही येथे जोरदार लढाई झालेली होती. पण ह्या लढाईचे स्वरूप काही वेगळेच होते. कच्छच्या रणात काही भाग भारताला गमवावा लागला होता. त्या सर्वांचा सूड आता भारतीय जवान घेत होते. अशी जबरदस्त मुसंडी मारलेली होती की पळपुटे पाकी पळत सुटले.

अशी मुसंडी मारायची म्हणजे तयारीही तेवढीच हवी. जवान

लढतात खरे पुढे पण पाठीमागे केवढी तयारी हवी असते. विशेषतः दारूगोळा व अन्न यांची रसद अतिशय महत्त्वाची. भारतीय जवानांना तीन तीन दिवस जेवण मिळाले नाही तरी त्यांनी भीमपराक्रम केलेले आहेत. पण त्यांना दारूगोळा भरपूर हवा. पेट्रोल हवं.

सिंध आघाडीवर ‘ नयाछोर ’ भागात तुंबळ लढाई चालू होती. भारतीय जवानांनी पाहता पाहता शत्रूची पीछेहाट केल्यामुळे दारूगोळा ऐन वेळी कमी पडू लागला होता. त्याचा पुरवठा सातत्याने व्हायला हवा होता.

पंजाब रेजीमेंटच्या कॅप्टन वीरसिंगांकडे ही दारूगोळ्याच्या पुरवठ्याची महत्त्वाची कामगिरी होती. ‘ मूनबाऊ ’ हे शेवटचे भारतीय स्टेशन. त्याच्या पलीकडे वास्तविक शत्रूची रेल्वेलाइन होती. पण जसजशी भारतीय सेना आत घुसली तसे लष्कराच्या इंजिनियर्सनी भारतीय व पाकिस्तानी रूळ जोडले ! शत्रूच्या लाइनवरून भारतीय दारूगोळ्यानी भरलेल्या आगगाड्या जाऊ लागल्या.

कॅप्टन वीरसिंग रोज हेच काम करीत होते. दारूगोळ्यानी भरलेली आगगाडी ते घेऊन जायचे. हें काम साधे नाही. पाकी विमानांचा जबरदस्त धोका असायचा. वाटेल त्या वेळी ती घिरट्या घालायची. पण विमानवेधी तोफांमुळे पळून जायची. पण जाता जाता जरी बॉम्ब टाकले तरी शत्रूचे काम व्हायचे. आगगाडी पेटता कामा नयें. काय वाटेल ते झाले तरी आगगाडी सुखरूप नेण्याकडे कॅप्टन वीरसिंग प्रथम पाहायचे.

युद्धकाळात ही जबाबदारी घ्यायची म्हणजे एक दिव्यच होते. दारूगोळ्याने भरलेली आगगाडी म्हणजे शत्रूला पर्वणीच.

शत्रूच्या अशा तऱ्हेच्या किती तरी आगगाड्या भारतीय विमानांनी नष्ट केलेल्या होत्या. जागोजागी रसद तोडली होती. पण पाकी वैमानिक हे धाडस फारसे करीत नसत. भारतीय हद्दीत तर ते यायलाच भ्यायचे. ते आले रे आले की त्यांचा पाठलाग तरी व्हायचा किंवा ते विमान पाडले तरी जायचे.

पण सिंधच्या ह्या आघाडीची गोष्ट वेगळी होती. तो शत्रूचाच प्रदेश होता. भारतीय सेना प्रचंड प्रमाणात तेथे घुसली होती. त्यामुळे कॅप्टन वीरसिंगांना फार काळजीपूर्वक काम करावे लागे. त्यांनी ही महत्त्वाची जबाबदारी आपणहून स्वीकारली होती. त्यांना मरणाची भीती नव्हती. त्यांना जाणीव होती कर्तव्याची. मग ते पार पाडण्यासाठी वाटेल तो त्याग करायची त्यांची तयारी होती. लहानपणापासून त्यांच्यावर हेच संस्कार झालेले होते. कोणतेही काम अर्धवट करण्याची त्याना सवय नव्हती. पंजाबची मातीच अशी काही वेगळी आहे की ती असे नरवीर तयार करते. अभिमानाने छाती फुलून जावी अशी देशप्रीती निर्माण करते. याच प्रेमाने कॅप्टन वीरसिंग भारून गेलेले होते. ते एकुलते एक होते. आपला मुलगा सैन्यात जाऊ नये असे त्यांच्या आईला वाटायचे, ती भ्यायची. दुसरा मुलगा असता तर ती माऊली सहज तयार झाली असती. पण इथे घराण्याचा प्रश्न होता. वंशाचा दिवा टिकायला हवा होता. वडिलांचा दृष्टिकोन जरा वेगळा होता. जेव्हा कॅ. वीरसिंगांनी सैन्यात जायचा निर्णय घेतला तेव्हा वडिलांनी लगेच परवानगी देऊन टाकली.

" वीर " त्याचे वडील म्हणाले, " तू अवश्य सैन्यात जा. मला त्याचे काही वाटणार नाही. पण एक गोष्ट कर, असा काही पराक्रम करून दाखव की साऱ्या भारताला तुझा अभिमान

वाटावा. पंजाबचा सुपुत्र सैन्यात नुसता असणार नाही. तो काही तरी पराक्रम करून दाखवील, जगाचे डोळे दिपावेत. तुझ्या आईला देखील मग तुझा अभिमान वाटेल. तिची परवानगी आहे असे समज."

आपल्या वडिलांचे शब्द त्यांच्या कानांत घुमायचे. ते संधीची वाट पाहात होते. त्यांना खरोखरच काही तरी करून दाखवायचे होते. त्यांच्या वरिष्ठानी युद्ध चालू होण्यापूर्वी त्यांना जेव्हा जबाबदारी कोणती उचलता असे विचारले होते, तेव्हा त्यांनीच दारूगोळ्याचा पुरवठा मागून घेतला होता. आपणहून त्यांनी भविष्याला आव्हान दिले होते. त्यातच त्यांच्या कर्तव्याचे सार्थक होणार होते.

नेहमीप्रमाणे एकदा ते दारूगोळ्यानी भरलेली आगगाडी घेऊन निघाले. विमानवेधी तोफांचे गनर्स सावध होते. टेहळ्या पाकी विमानाने गाडी हेरली असावी. एकदम चार विमाने आली ! विमानवेधी तोफांनी आग ओकायला आरंभ केला. पण शत्रू दाद देत नव्हता. एकदम आल्यामुळे त्याला झपाटा मारता आला. त्यांनी आगगाडीवर बॉम्बसचा वर्षाव चालू केला. कानठळ्या बसणारे प्रचंड आवाज सुरू झाले. विमानवेधी तोफां-मुळे एका विमानाला जबरदस्त टोला बसला. शेपटीकडील भागच तुटला. ते विमान जायबंदी झाले, एकदम पळाले. ते पळालेले पाहताच बाकीचीही विमाने पळून गेली ! आगगाडीचा पुढील भाग पेटला होता. मागचे काही डबे शिल्लक होते. दारू-गोळा आघाडीवर जाणे अत्यंत जरुरीचे होते.

कॅप्टन वीरसिंगांनी खाली उडी मारली. आग चांगलीच भडकली होती. घाई करायला हवी होती. आगीच्या डोंबातून

मागील बरेचसे डबे वाचविता येणे शक्य होते. पण त्यासाठी भडकत्या ज्वालात घुसायला हवे होते. आगीच्या लोळातून कामगिरी पार पाडायला हवी होती.

कॅप्टन वीरसिंगांनी क्षणाचाही विचार केला नाही. १९६५ च्या वेळी फायरमन चमनलालांनी असेच पेटलेल्या गाडीचे किती तरी डबे वाचविले होते. ती गोष्ट ते विसरले नव्हते. ते लगेच त्या आगीत घुसले. स्फोटामागून स्फोट होत होते. आत शिरणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखेच होते.

पण आता त्यांना कशाची पर्वा नव्हती. आपला देह ते आता विसरले होते. त्यांना दिसत होते फक्त कर्तव्य. दारूगोळा वाचवायला हवा. जवानांना लढताना काही कमी पडता कामा नये. पुरवठ्याची जबाबदारी आपण स्वीकारली आहे ती पार पाडली पाहिजे. वडिलांना दिलेला शब्द पाळायला हवा.

त्यांनी पेटलेल्या डब्याजवळ जाऊन पाठीमागचा न पेटलेला डबा सोडविला. त्यांच्या अंगात कुठून एवढी शक्ती आली कुणास ठाऊक. त्यांनी आपले सारे बळ पणाला लावून ते मागील डबे असे विलक्षण नेटाने ढकलले की पाहता पाहता ते लांबपर्यंत गडगडत गेले ! आगीच्या तडाख्यातून वाचले ! जवानांचे काम भागण्याइतका दारूगोळा त्यात निश्चित होता.

कॅप्टन वीरसिंग ओळखू न येण्याइतके भाजले होते. त्यांच्या अंगावरचे कपडे तर काळे ठिक्कर पडले होते. केस जळाले, चेहरा विद्रूप झाला. अंगाची भयानक आग होत होती. ते विलक्षण भाजले होते.

पण त्यांनी कर्तव्यपूर्ती केली. वडिलांना दिलेला शब्द पुरा केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शाबासकी मिळविली. बारमेर


आघाडीचे प्रमुख मेजर जनरल आनंदना हे जेव्हा कळाले तेव्हा ते धावत हॉस्पिटलमध्ये गेले. सर्वांगाला औषधे लावलेले कॅप्टन वीरसिंग अजून शुद्धीवर आले नव्हते. तेथील इतर अधिकाऱ्यांना ते म्हणाले, "कॅप्टन वीरसिंगांसारखे बहाद्दूर आमच्या जवळ आहेत तेव्हा आम्हाला विजय का मिळणार नाही ? प्राणाची पर्वा न करता ते कर्तव्याला जागले."

आपल्या वरिष्ठानी केलेले कौतुक कॅप्टन वीरसिंगांना नंतर समजले. ते धन्य झाले.

कर्तव्यपूर्तीचा विलक्षण आनंद त्यांना झाला. आपल्या अंगाचा दाह कमी होत आहे असे त्यांना वाटू लागले !

* * * *

# ८. हात तुटला तरीही लढला!



राजस्थान आघाडीवर भारतीय जवानांनी मुसंडी मारली आहे. प्राणाची पर्वा न करता पाकी सैतानांना मागे रेटीत रेटीत निधड्या छातीचे जवान पुढे सरकत आहेत. शत्रूच्या तोफांची त्यांना पर्वा नाही. मशीनगन्सच्या गोळ्यांना ते दाद देत नाहीत. सिमेंटच्या पक्क्या बंकर्सना ते भीक घालीत नाहीत. शत्रू जेरीस आलेला आहे.

'गाद्रा' शहर लढविण्यासाठी पाकी सैन्याने जिवाची पराकाष्ठा केली. त्या ठिकाणी शत्रूने अतिशय तयारी केलेली होती. सिमेंट कांक्रीटचे पक्के बंकर्स तयार होते. भारी पल्ल्याच्या तोफा लावून तयार होत्या. मशीनगन्सचे मोर्चे बांधून सुसज्ज होते. नव्हती फक्त जिद्द, नव्हता फक्त पराक्रम, नव्हता फक्त उत्साह, नव्हते फक्त देशप्रेम.

भारतमातेचा जयजयकार करीत भारतीय जवान पाकी

पळपुट्यांवर तुटून पडले. ती मुसंडी जीवघेणी होती. तोफांची काय किंवा मशीनगन्सची काय भीती न बाळगता जवानांनी त्या दोन्ही गोष्टी बंद पाडल्या. 'गाद्रा' गावाची भिंत न् भिंत लढविली गेली. घराघराचा उपयोग बंकरसारखा झाला. पण अखेर याह्यासुराच्या बकासुरांना पळावे लागले. भीमकाय भारतीय जवान त्यांना पुरून उरले. 'गाद्रा' गावाचा दगड नि दगड ह्याला साक्ष आहे. असला जगावेगळा पराक्रम त्या भागात कधी घडला नसेल. १९६५ च्या लढाईचा अनुभव अजून पाकी सैन्य विसरले नव्हते. पाकी नागरिक तर कधीच घरेदारे सोडून पळून गेले होते. भारतीय जवान नागरिकांना धक्का लावीत नाहीत हे माहीत असूनही त्यांना तेथून हुसकावून लावण्यात आले होते. जबरदस्त भीती निर्माण करण्यात आली होती. कारण नागरिकांच्या घराघरांतून पळपुट्या पाकी शूर वीरांना लपता यावे हा हेतू.

'गाद्रा' सोडून पाकी सेना पिसाटाप्रमाणे धावू लागताच भारतीय जवान त्यांच्या मागे हात धुऊन लागले. कापून काढू लागले.

'गाद्रा' जरी पडले तरी त्याच्या मागेही सारी लपण्याची व्यवस्था होतीच. याह्यासुराच्या सेनेने लढण्यापूर्वी प्रथम काय केले असेल तर सुरक्षित ठिकाणे. पक्के बंकर्स. पाकी सेना पुन्हा घराघरांतून लपून राहिली. सिमेंटच्या बंकर्समध्ये घुसली. तेथून त्यांनी मशीनगन्सचा तुफानी मारा चालू केला.

रात्रीची वेळ होती. पराजयामुळे खवळलेले पाकी अधिकारी चिडले होते. त्यांनी सैनिकांना शिव्या घातल्या होत्या.

"भागो मत ... कमीने ... ! भागो मत" एक पाकी

अधिकारी गर्जत होता, " फायर करो . . . एक कुत्ता भी नहीं आगे आने दो · · · फायर · · · फायर · · · "

अधिकारी ओरडत होते. फायर ! फायर ! फुकट मिळालेल्या दारुगोळ्याची आतषबाजी पाकी सैनिक करीत होते. सारी जमीन भाजून-पोळून निघत होती. सिंधच्या वाळवंटाच्या त्या परिसरात कदाचित इतका पावसाचाही वर्षाव होत नसेल ! पण ती किमया याह्यासुराचे सेवक करीत होते.

डिसेंबर महिना, कडक थंडी पडलेली होती. साधा मनुष्य घराबाहेरही पडला नसता. पण रणवेड्या भारतीय जवानांना थंडीचे काहीच वाटत नव्हते. मोकळ्या माळावर त्यांच्या कितीतरी रात्री गेल्या होत्या, जात होत्या.

रायफलमन कौशलराम व त्याच्या बरोबरीचे इतर जवान पाकी पळपुट्यांचा पाठलाग करीत आले होते. पळपुटे सैनिक आता बंकर्समध्ये जाऊन सुरक्षित तर झाले होतेच पण त्यांनी मशीनगन्स चालू केल्या !

रायफलमन कौशलराम आता परत फिरणार काय ! नाही. तो भारतीय जवान आहे. माघार हा शब्द त्याला माहीत नाही. एकदा पुढे टाकलेले पाऊल तो मागे घेत नाही. मग त्याला कशाची भीती ! ज्या देशाला पौरुषाची परंपरा आहे त्या देशाचा कौशलराम हा जवान होता. त्याने निर्धार केला. त्याच्या आसपास तोफांचे गोळे फुटत होते. मशीनगन्स आग ओकीत होत्या.

कौशलरामने आपल्या सहकाऱ्यांना तेथेच थांबण्यास सांगितले. तो एकटाच पुढे निघाला. ज्या खंदकातून पाकी सैतान गोळ्या सोडीत होते त्या खंदकाकडे कौशलराम निघाला. त्या मस्तवाल मशीनगन्स त्याला बंद पाडायच्या होत्या. माणुसकीला पारखे

असलेले ते पाकी नराधम त्याला ठार मारायचे होते. भारतीय हिसका त्यांना दाखवायचा होता.

कौशलराम खंदकाकडे रांगत रांगत, सरपटत सरपटत निघाला. लहान लहान झाडाझुडपांचा त्याला आधार मिळत होता. रात्रही चांदणी जरी होती तरी थोडे ढग आलेले होते. तरीही त्या पुसट अंधारात त्याला शत्रूने हेरले होते. एक तोफगोळा अगदी त्याच्या. जवळ फुटला. त्याचा एक हात तुटला ! लोंबू लागला, रक्ताची धार लागली. प्राणांतिक वेदना होऊ लागल्या. एखादा कच्च्या दिलाचा असता तर बंदूक तेथेच टाकून आपले प्राण वाचविण्या-साठी पळत सुटला असता.

हात तुटलेला जवान ज्या अर्थी माघारी जात नाही त्या अर्थी तो भारतीयच असला पाहिजे. कौशलराम तसाच पुढे निघाला. त्याला दुसरे तिसरे काही दिसत नव्हते. दिसत होते ते फक्त सैतान. त्या सैतानांचा कधी एकदा निकाल लावतोय असे त्याला झाले होते.

अखेर तो बंकर जवळ आला. कौशलरामने हळूच हातबॉम्ब त्या खंदकात टाकला. त्या पाठोपाठ दुसरा. तिसरा. बॉम्बने किमया केलेली होती. मशीनगन चालविणारे पाकी सैतान भाजून पोळून उलथे पालथे पडले होते. मशीनगन थांबली होती.

कौशलरामने ते दृश्य डोळे भरून पाहून घेतले. आता मागील जवानांची वाट मोकळी झाली होती. घराघरांतून लपलेले पाकी पळपुटे पुन्हा मागे पळत सुटतील. कौशलरामने आत्ता कोठे आपल्या हाताकडे पाहिले. त्याचे सर्वांग रक्ताने माखलेले होते. आता एक पाय पुढे टाकण्याचीही शक्ती त्याला राहिली नव्हती. त्याच्या डोळ्याला अंधारी येऊ लागली. भयानक थकवा वाटू


लागला. कौशलराम खाली कोसळणार एवढ्यात मागील जवान धावत पळत पुढे आले. त्यातील एकाने जखमी कौशलरामला सावरून धरले. मेडिकल कोअरच्या ताब्यात देऊन हॉस्पिटल-कडे पाठविले.

अचाट पराक्रम करून कौशलरामने रस्ता मोकळा केला. त्याच्या नावाचा जयजयकार करीत भारतीय जवान गनिमावर तुटून पडले. पाकी सैतानांची पुन्हा धावपळ सुरू झाली.

ही सारी किमया कौशलरामची होती.

* * * *

# १. शत्रूच्या खंदकात उडी !



याह्यासुराचे स्वप्न अपुरे राहिले. भारतावर एकदम हल्ला करून भारतीय भूमीचे लचके तोडण्याचे त्याचे मनसुबे अर्धवट राहिले. भारतीय सीमारक्षक जवान व सेनाधिकारी सावध होते. मेल्या आईचे ते दूध प्यायलेले नव्हते.

कॅप्टन सोमदत्त फाजिल्का भागात सरहद्दीजवळ आपल्या निवडक जवानांसह डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते. शत्रूच्या साऱ्या सवयी त्यांना माहीत होत्या. याह्यासुराचे राक्षस काही वेळा दबून हल्ला करायचे. काही वेळा चिनी तंत्राने एकदम हल्ला करायचे. भारतीय जवानांचा अगोदर अंदाज घ्यायचे. कॅप्टन सोमदत्तांना हे सारे ठाऊक होते. सीमेवरील पाकी कटकटी नेहमीच्या होत्या. कितीही 'ताश्कंद करार' झाले तरी त्यांची खोड जायची नाही.

युद्धाला सुरुवात होत होती. पाकी विमानांनी भारतावर बेछूट

हल्ला केलेला होता. भारतीय विमानांनी त्याला चोख उत्तर दिलेले होते. १९६५ मध्ये याच भूमीवर पाकी कंबरडे मोडलेले होते. ती पाकी माती हे अजून विसरलीही नसेल. युद्धाची सारी पाकी यंत्रणा खलास करून टाकलेली होती. जागोजागी पॅटनचे मुडदे व सेबर-जेटची धुडेच्या धुडे पडलेली होती. तरीही याह्यासुराची खुमखुमी अजून गेलेली नव्हती. चिनी व अमेरिकन मैत्रीच्या जोरावर त्याने पुन्हा युद्धाची बाजी लावायचे ठरविले होते !

शत्रूच्या हालचाली सीमेपलीकडे दिसू लागल्या होत्या. कॅप्टन सोमदत्तांनी आपले ४० जवान तयार ठेवलेले होते. विमानहल्ले सुरू झाल्याचे रेडिओवरून सगळ्या सीमेवर कळाले होते.

"साब" एक जवान म्हणाला, "अब क्या होगा !" "क्या होगा ?" सोमदत्त हसून म्हणाले, "गनीम खतम् होगा . . . बाकी कुछ नहीं होगा . . ."

कॅ. सोमदत्तांनी जवानांना सावध राहण्यास सांगितले. शत्रूच्या संभाव्य हल्ल्याची कल्पना दिली. रात्र होताच जागरूकता वाढली. कॅप्टन सोमदत्त अस्वस्थ होते. एकसारखे चाहूल घेत होते. परंतु रातकिड्यांचाच आवाज अधिक होता.

त्यांच्या ठाण्यासमोर दाट झाडी होती. त्यात काही पाकी सैनिक खरोखरच गोळा झालेले होते. तेही भारतीय जवानांची चाहूल घेत होते. त्यांचा प्रमुख त्यांनाही विविध सूचना देत होता, त्याने दोन तीन निवडक लोकांना सीमेजवळच्या 'बंकर' मध्ये जाण्यास सांगितले होते. खुणेचा आवाज होताच मशीनगन्स चालू करण्यास सांगितले होते.

खुणेचा आवाज होताच पाकी सैनिकांनी खंदकातून मशीन-गन्स चालू केल्या ! याह्यासुराच्या देशाच्या नावाच्या जोरजोराने

घोषणा केल्या ! कॅप्टन सोमदत्तांना अपेक्षित असे घडले होते. त्यांनी लगेच जवानांना तातडीच्या सूचना दिल्या. ते होते त्यापेक्षा अधिक मागे पण जरा पलीकडे त्यांना तयार राहण्यास त्यांनी सांगितले.

“ हे पाहा ” कॅप्टन सोमदत्त म्हणाले, “ कुणीही जागचे हलू नका. मी एकटा पुढे जाईन. शत्रू किती आहे याची आपल्याला कल्पना नाही, आपलाही अंदाज त्या निमकहरामांना येता कामा नये. त्यांची चाल त्यांच्यावरच आपल्याला उलटून लावायची आहे. ”

आपल्या जवानांचे प्राण वाचविण्यासाठी कॅप्टन सोमदत्तांनी ह्या डाव आखलेला होता. शिवाय त्यांच्याजवळ फक्त चाळीसच जवान होते. शत्रूचे सैनिक किती होते याची काहीच कल्पना नव्हती. पण त्यांना एकदम हल्ला करून संकटात पडायचे नव्हते.

मशीनगन्स आग ओकीत होत्या, गोळ्यांचा वर्षाव होत होता. कॅप्टन सोमदत्तांनी विलक्षण धाडस करण्याचे ठरविले होते. आगीच्या वर्षावाला न भिता कॅप्टन सोमदत्त पुढे सरकत होते, सरपटत निघाले होते. लहान लहान झुडपांचा आधार त्यांना मिळत होता. त्यामुळे त्यांचे अस्तित्व शत्रूला अजून जाणवले नव्हते. आता त्यांना त्या झुडपाआडून मशीनगन्सची तोंडे दिसत होती. छोटया खंदकांत किती सैनिक असावेत याचा मात्र त्यांना अंदाज येईना.

त्यांनी निर्धार केला, ते पुढेच चालले. आता खंदक जवळ जवळ येत चाललेला होता. अतिशय सावधगिरीने ते चालले होते. कारण झाडीत अजून किती शत्रू लपलेला आहे हे कळत नव्हते. ते अजून सरपटतच होते.

आता खंदक जवळ आला, त्यांनी कमरेचा हँडग्रेनेड काढला.

एकदम खंदकांत टाकला. पाठोपाठ बरेच हँडग्रेनेड्स टाकले. आगीचा लोळ उठला. मशीनगन्स बंद पडल्या. परंतु स्टेनगन्सचा मारा सुरू झाला. शत्रू अजून जिवंत होता. अखेरची धडपड करीत होता. त्यांनी पुन्हा हातबॉम्ब खंदकात टाकले.

आता मात्र बंदुका थांबल्या, शत्रू थंडावला, आपली बंदूक पुढे करून कॅप्टन सोमदत्त खंदकाजवळ आले. त्यांनी फैरी झाडल्या. सावधगिरी घ्यायला हवी होती, पण उत्तर आले नाही.

कॅप्टन सोमदत्तांनी धावत जाऊन खंदक गाठला. दोन पाकिस्तानी आंत मरून पडले होते. त्यांनी पटकन् त्या मशीनगनचे तोंड फिरविले. ती नादुरुस्त झालेली नव्हती. त्यांनी ती चालू केली व पलीकडच्या झाडीवर गोळ्यांचा वर्षाव पाडू लागले. त्यांच्या पाठोपाठ ते चाळीस जवानही येऊन उभे राहिले. त्यांनी घोषणा करण्यास आरंभ केला. त्यांतील किती तरी जवान ' मऱ्हाठे ' होते.

" हर हर महादेव ऽ " ची प्रचंड घोषणा हवेत घुमताच पाकी सैनिक " या ऽ अल्ला ! " " या ऽ तोबा " करू लागले. दारूगोळा टाकून पळत सुटले बंदुका घेऊन भारतीय जवानांनी त्यांचा पाठलाग करून काही मुडदे पाडले.

शत्रू पळाला, केवळ एका कॅप्टनने युक्तीने त्याला घाबरवून सोडले. गनीम जीव वाचविण्यासाठी धांवत पळत निसटला.

कॅप्टन सोमदत्तांनी विलक्षण धाडस केलेले होते. त्यांच्या पराक्रमाला तोड नव्हती. पळपुट्या भेकड पाकी सैनिकांना भीतीचा धसका लावून त्यांनी पळवून लावले होते.

शत्रूचा किती तरी दारूगोळा त्यांनी हस्तगत केला.

कॅप्टन सोमदत्तांसारखे पराक्रमी अधिकारी व जवान भारतीय सीमेवर असताना पाकी पळपुट्यांची डाळ कशी शिजणार ?

म. क्रं. ९६२३८
वा. क्र.
दि. ०१·९१

# १०. परत येणार नाही!



केवढी प्रचंड सीमा ! भारताचा जर नकाशा पाहिला तर 'अरुणाचल' राज्यापासून सौराष्ट्रापर्यंत ! अरे बापरे ! ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत. कुठे रेताड वाळवंट तर कुठे हजारो मैल उंचीचे बर्फाळ डोंगर. आणि शत्रू कसा तर पक्का दगाबाज. चिनी बेभरवशाचा तर पाकिस्तानी अट्टल हरामखोर. एका वेळी चिनी आणि पाकीस्तानी दोघेही सांभाळावे लागतात. दोघे एकमेकांसाठी जीव टाकणारे. परंतु एवढ्या प्रचंड सीमेवर हजारो भारतीय जवान रात्रंदिवस जागता पहारा करीत आहेत. त्यांना कशाचीही पर्वा नाही. लाह्या फुटणारे ऊन्ह असो नाहीतर रक्त गोठणारी थंडी असो. वाळूचे वादळ असो अगर वादळी पाऊस असो. सीमेवर जवान उभे आहेत. त्यांना सुट्टी नाही, सण नाही. वार नाही, दिवाळी असो अगर गुढीपाडवा असो. संक्रांत असो अगर पोळा असो. त्यांचा पहारा चुकत नाही. ते सीमेवर आहेत

म्हणून देशात दिवाळी आहे. रात्रंदिवस ते जागे आहेत म्हणून देशात सुखाची झोप आहे. म्हणूनच त्यांच्यासाठी ओठी घास अडकायला हवा. पदोपदी त्यांची आठवण व्हायला हवी. बंदुकीच्या जगात वावरणारे हे देवदूत आहेत. आपले प्राण खर्चून देशाचे वाचवितात.

कॉन्स्टेबल जगजितसिंग असाच सीमेवर होता. डोळ्यांत तेल घालून सीमेचं रक्षण करीत होता. पाकिस्तानी गनीम एक इंचही पुढं येऊ नयेत याची खबरदारी घेत होता.

पाकिस्तानच्या सरहद्दीजवळील फिरोजपूर आघाडीवर तो पहारा करील होता. जवळच सतलजचा पूल होता. त्यामुळे विशेष खबरदारी घ्यावी लागत होती. ती सतलज शांतपणे वाहात होती. दुथडी भरभरून वाहात होती. किती वर्षे झाली, तिच्या किनारी शांतता नव्हती. शेकडो वर्षे झाली, तिच्या परिसरात तिच्या बरोबरीने रक्ताचे पाट वाहत आहेत. किती योद्धे. किती पराक्रम. किती लढाया. सारे सारे तिने पाहिले आहे. किंबहुना ती ज्या प्रांतातून वाहते ती पंजाबची भूमी ही भूमी नसून रणभूमीच आहे. तिच्या मातीत वाढणारे पंजाबी जन्मतःच रणवीर आहेत. कॉ. जगजितसिंग त्याच मातीतील होता. त्याची जबाबदारी तो ओळखीत होता. त्याच्या मदतीला काही जवान होते. जवळच ठाणे हाते. सतलज ओलांडली की तेथेच ठाणे होते.

तीन डिसेंबर १९७१. ही तारीख कोणते भविष्य घेऊन जन्माला आली कुणास ठाऊक ! याह्यासुराने जर ‘ पंचांग ’ पाहिले असते तर तो दिवस त्याच्या राशीला अशुभ दिसला असता. परंतु सैतानांच्या जवळ पंचांगे असत नाहीत. ती जर असती तर जगाचे चित्रच बदलले असते. याह्यासुराने आपणहून भारताला डिवचले.

त्या दिवशी बारा भारतीय विमानतळांवर त्याने बेबंद बॉम्बवर्षाव केला. ते वैमानिक इतके पट्टीचे नेमबाज होते की त्यांचा एकही बॉम्ब विमानतळावरील महत्त्वाच्या ठिकाणी पडला नाही. भारताचे काहीच नुकसान झाले नाही. पण त्याच रात्री भारतीय वैमानिकांनी सारे पाकिस्तान भाजून पोळून काढले. लष्करी महत्त्वाची एकही गोष्ट शिल्लक ठेवली नाही. विमानतळच्या विमानतळ उद्ध्वस्त केले. तेथे उभी असणारी विमानेही जागच्या जागीच नष्ट केली. रडार यंत्रणा नेस्तनाबूद करून टाकली.

ह्या पाकी आक्रमणाची वार्ता साऱ्या सीमेवर पसरली. ठिकठिकाणच्या ठाण्यावरील जवान रेडिओला कान लावून बसले होते. युद्ध जवळ आले होते. अगदी हाताशी आले होते. पण अजून हुकूम नव्हते. घोषणा नव्हती. तयारी मात्र सारी होती. जवान फक्त हुकमाची वाट पाहात होते.

कॉ. जगजितसिंग जागेच होते. मध्यरात्रीचा समय. ते पहारा करीत होते. तोच पाकी गनीम आले. तोफखान्यासह आले. संख्याही भरपूर असावी. त्यांनी एकदम हल्ला चढविला. त्या सैतानांच्या मानाने सीमेवर भारतीय जवान फारच थोडे होते. दारूगोळाही भरपूर नव्हता. तेथील वायरलेस ऑपरेटरने ही वार्ता प्रमुख केंद्राला सांगितली. केंद्राला अजून लढाईचे हुकूम नव्हते. केंद्र काय सांगणार ? त्यांनी माघार घेण्यास सांगितले !

कॉ. जगजितसिंग पंजाबचे रणवीर होते. एक वेळ हा मरेल पण शरण येणार नाही. का म्हणून शरण जायचे ? आम्ही काय नामर्द आहोत ? दुबळे आहोत ?

त्यांनी आदेश पाळला नाही. त्यांनी स्वतः निर्णय घेतला. झुंजायचा. लढायचा. ते व त्यांची तुकडी सिद्ध झाली. होता तेवढा

दारूगोळा घेतला. त्यांनी प्रत्युत्तर दिले. भारतीय जवान गोळीबार करू लागले. गनिमांच्या हल्ल्याला उत्तर मिळू लागले. दारूगोळा संपत आला. पंचाईत पडली.

कॉ. जगजितसिग लेचेपेचे नव्हते. त्यांनी सतलजमध्ये उडी मारली. ठाण्यावरून दारूगोळा त्यांना आणायचा होता. आता माघार शक्य नव्हती. काही क्षणातच त्यांनी सतलज पार केली. ठाण्यावरून भरपूर दारूगोळा आणला. बाकीचे जवान लढतच होते. दारूगोळा संपत आलेला आहे याची गनिमाला वार्ता नव्हती. आता पुन्हा दारूगोळा आल्यावर भारतीय जवान पुन्हा तुटून पडू लागले. भारतीय जवान किती आहेत याचा शत्रूला अंदाज येईना. चलाख कां. जगजितसिंगांनी ठिकठिकाणी जवान पेरून ठेवले होते त्यामुळे चौफेर गोळीबार चालू होता. गनीम सावध राहून हल्ला करू लागला होता. कॉ. जगजितसिंगांची युक्ती उपयोगी पडली होती. शत्रू चक्रावला होता.

पुन्हा दारूगोळा संपत आला. कॉ. जगजितसिंगांनी पुन्हा सतलज पार केली व नव्याने दारूगोळा आणला. ते लढू लागले. इकडून तिकडे व तिकडून इकडे असे पळत त्यांनी गोळीबार चालू ठेवला. ते पुढे पुढे जाऊ लागले. पुढे जाऊन गोळीबार करू लागले. त्यांना विलक्षण चेव आला. रणदेवता त्यांच्या अंगात भिनली, संचारली. त्यांना गनिमाशिवाय दुसरे काही दिसेना. त्यांच्या गोळीबाराने पुढचे काही गनीम ठारही झाले होते.

पण शत्रूच्या गोळ्या त्यांच्या अंगात घुसू लागल्या. ते माघारी फिरेनात. रक्ताने न्हाऊन निघाले तरी त्यांचा चेव कमी झाला नव्हता. ते झुंजत होते. आपल्याकडील एकही जवान कामी आलेला नव्हता.

कॅ. जगजितसिंगांनी झुंज चालू ठेवली. ठाणे ते लढवीत राहिले. त्यासाठी त्यांनी जिवाची पराकाष्ठा केली. दोनदा सतलज पार करून दारूगोळा आणला. परंतु आता त्यांचे शरीर थकले. भयंकर रक्तस्रावामुळे त्यांचा तोल जाऊ लागला, ते जिवाच्या करारावर लढत होते.

तोच भारतीय जवानांची मोठी तुकडी त्या ठिकाणी तोफ-खान्यासह आली. त्यांनी पाहता पाहता असा प्रचंड हल्ला केला की दारूगोळा टाकून शत्रू पळत सुटला. ठाणे बचावले.

मदतीला तोफखाना व जवान येताच कॅ. जगजितसिंगांना त्यांच्या जवानांनी उचलून पाठीमागे आणले होते. लढण्याची त्यांच्या अंगात अजीबात शक्ती नव्हती. जवान येईपर्यंत ते कसे तरी उभे होते. जवान येताच ते कोसळले.

कोसळलेले कॅा. जगजितसिंग पुन्हा उठले नाहीत. ठाणे पडणार नाही असे त्यांना वाटताच त्यांचा जर्जर झालेला प्राण निघून गेला. आपल्या अपार पराक्रमाच्या जोरावर त्यांनी ठाणे लढवीत ठेवले होते. ' परत फिरा ' असा आदेश असतानाही ते लढत राहिले.

ती त्यांची ज़िद्द, तो त्यांचा पराक्रम, ती त्यांची युक्ती, ती झुंजार वृत्ती, देश कधी विसरणार नाही.

असे असामान्य वीर जोपर्यंत ह्या देशाच्या सीमेवर आहेत तोपर्यंत देश कधीही संकटात येणार नाही !

* * * *

# ११. शत्रूला कंठस्नान !



युद्धाचे वातावरण तापलेले होते, पळपुटे पाकिस्तानी अधून-मधून नेम टिपून एकदम गोळीबार करीत होते. युद्धाची ठिणगी केव्हा पडेल याचा काही नेम नव्हता. भारत-पाकिस्तानच्या सीमेवर समोरासमोर दोन्ही सेना केव्हा येतील याचा काही नेम नव्हता. दोन्ही देशांची सारी तयारी परिपूर्ण झालेली होती. विशेषत: शत्रूने मजबूत मोर्चे बांधलेले होते. आपल्या हेरांनी सारी माहिती आणलेली होती. सिमेंटने बांधलेले पक्के 'बंकर्स' कितीतरी तयार होते, सगळीकडे खंदक खणून ठेवलेले होते. सैन्य सीमेवर गोळा तर झालेले होतेच पण त्यांच्या हालचालीही चालू झालेल्या होत्या.

सीमेवरील आपले जवान रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते. शत्रूची प्रत्येक चाल हेरीत होते. अमृतसर परिसरातील आपले एक ठाणे असेच जागृत होते. त्याच्या जव-

ळूनच पाकिस्तानचा 'इच्छोगिल' कालवा वाहात होता. ह्या कालव्यापलीकडे शत्रू फार बंदोबस्तात होता. ठाण्याचे प्रमुख हेडकॉन्स्टेबल मोहिंदरसिंग हे सारे जाणून होते. १९६५ चा त्यांना अनुभव होता. शत्रूच्या साऱ्या सवयी त्यांना माहीत होत्या. आपल्या बरोबरच्या नव्या साथीदारांना मोहिंदरसिंगांनी मागच्या युद्धाच्या किती तरी आठवणी सांगितल्या होत्या. त्या ऐकून सारे साथीदार शत्रूच्या हालचालींची वाट पाहात होते. आपली शस्त्रे सावरून तयार होते. आपापली जागा सांभाळीत होते. संधीची वाट पाहात होते.

१९७१ चा डिसेंबर महिना उगविला तो नवी चाहूल घेऊनच. बांगला देशातील मुक्तिवाहिनीच्या जबरदस्त टोल्यामुळे याह्याखान संतापला होता. पूर्व पाकिस्तानच्या साऱ्या सीमेवरून पाकिस्तानी तोफा आग ओकू लागल्या होत्या. त्यांची चोरटी विमाने भारतीय हद्दीत येताच नेहमीप्रमाणे पाडण्यातही आली होती. त्रिपुरा, आगरतळा वगैरे सीमेनजीकचे भाग शत्रूने भाजून पोळून काढलेले होते. मुक्तिवाहिनीने साऱ्या अंतर्गत भागात गनिमी काव्याने शत्रूला बेजार करून सोडले होते. पाकी सेनेचे अत्याचार वाढलेले होते. पाकी सेनानी चिडलेले होते. याचा प्रतिसाद पश्चिम आघाडीवर उमटणे अपेक्षित होते.

दोन डिसेंबरची रात्र, मोहिंदरसिंग आपल्या बंकरमध्ये तयारीत होते. पौर्णिमा असल्यामुळे चांदणे अपेक्षित होते. परंतु ढगामुळे प्रकाश म्हणावा तसा नव्हता. तो त्यांना कसली तरी चाहूल आली. आवाज आला. त्यांनी रोखून पाहिले. शत्रू येत होता! ज्या क्षणाची मोहिंदरसिंग वाट पाहात होते तो क्षण आला होता. गुरु गोविंदसिंहाच्या पवित्र नावाचा जयजयकार करीत मोहिंदरसिंगांनी

आपली बंदूक चालू केली. गोळ्यांचा वर्षाव चालू होताच शत्रूनेही आग ओकायला प्रारंभ केला. पण त्याचा दम टिकला नाही. मोहिंदरसिंगांनी अचूक नेम साधलेले असतात. शत्रू पळून जातो !

पुन्हा काही काळ नीरव शांतता पसरते. पण थोडाच वेळ. शत्रूची हौस अजून जिरलेली नसते. तो पुन्हा चालून येतो. मध्यरात्र उलटलेली असते. गार वारा सुरू असतो. शत्रू जोराचा मारा करीत चालून येतो. मोहिंदरसिंग सावध असतात. आता काही तरी युक्ती करायला हवी असते. आपले जवान किती आहेत हे शत्रूला कळता कामा नये. शत्रूचा गोळीबार चालू होताच मोहिंदरसिंग बंकरबाहेर पडतात ! चारी बाजूंनी बंदुकीच्या फैरी झाडतात. ह्या खंदकाकडून त्या खंदकाकडे धावतात. प्रत्येक ठिकाणाहून गोळीबार करतात. शत्रूला कळेना ! अंदाज लागेना. शत्रू बुचकळ्यात पडतो ! घाबरतो !

मोहिंदरसिंगांना जोर चढतो. त्यांच्या हातापायात गोळ्या घुसल्या होत्या. पण त्यांना त्याची काळजी नव्हती. त्यांचा निर्धार कायम असतो. ते रणवेडे झालेले असतात. पाहता पाहता सात शत्रूंना त्यांनी एकट्यानी कंठस्नान घातलेले असते. त्यांच्या अंगात विलक्षण बळ संचारलेले असते. एका शत्रूशिवाय त्यांना दुसरे-तिसरे काहीही दिसत नव्हते.

तेवढ्यात आणखी एक गोळी त्यांच्या पायात घुसते. शत्रू समोर उभा असतो. ते त्याला गोळी मारणार . . . पण बंदूक रिकामी होते ! गोळ्या संपलेल्या असतात ! मोहिंदरसिंग पटकन खंदकात उडी मारतात. शत्रू पाठोपाठ येतोच. मोहिंदरसिंगांना चेव चढतो. 'सत् श्री अकाल' चा जयघोष करीत मोहिंदरसिंग बंदूक उलटी करून दस्त्याने शत्रूवर असा जोरदार हल्ला करतात

की शत्रू विलक्षण प्रचंड आवाजात किंचाळतो. हतबल होतो. शत्रू त्यांना संगिनीने भोसकतो. पण मोहिंदरसिंगांना त्याचे काहीच वाटले नाही. रक्तबंबाळ अवस्थेत अखेर त्या शत्रूला ते खाली लोळवितात. शत्रूच्या किंचाळ्यांनी बाकीचे पळपुटे पाकी पळून जातात.

आता मात्र मोहिंदरसिंग खंदकात कोसळले. देहाची चाळण झालेली. रक्ताने न्हालेले मोहिंदरसिंग भारतमातेची माती कपाळाला लावतात.

सकाळ होते. शत्रूचे आठ मुडदे सीमेवर पडलेले असतात. मोहिंदरसिंगांचा निष्प्राण देह खंदकात चिरविश्रान्ती घेत असतो. ठाणे सुरक्षित असते. शत्रूची कारवाई सफल झालेली नसते.

झुंझार मोहिंदरसिंगांनी आठ पाकी भेकडांना कंठस्नान घातल्याचे सकाळी कळून येते.


आपली जबाबदारी पार पाडीत असताना वीर मोहिंदरसिंगांना मरण आलेले असते. देहाची चाळणी झालेल्या मोहिंदरसिंगांच्या कलेवराकडे पाहून त्यांच्या पराक्रमाची कल्पना इतरांना आली.

सीमा सुरक्षा दलाचे प्रमुख जनरल अश्विनीकुमार म्हणाले, " मोहिंदरसिंगांसारख्या पराक्रमी रणशार्दूलांच्या ताब्यात जोपर्यंत भारतीय सीमा आहे तोपर्यंत ती सुरक्षित आहे असे समजायला हरकत नाही. "

युद्ध संपले पण मोहिंदरसिंगांचा पराक्रम निरंतर राहिला. त्यांचे बलिदान वाया जाणार नाही.

* * * *

# १२ बलुच्याला घडली अद्दल



बांगलामधील पीरगंज आघाडी. तेथे एके ठिकाणी एक मजेदार दृश्य दिसत आहे. एक पाकी अधिकारी व भारतीय अधिकारी आमनेसामने येऊन शस्त्र न घेता लढत आहेत ! म्हणजे चक्क कुस्ती चालू आहे. कुस्ती ? इतकी शस्त्रे व अस्त्रे निघाली असता कुस्ती ? होय कुस्ती, दांत ओठ खाऊन -- शिव्यागाळी करून-लालमलाल झालेला पाकी अधिकारी कमालीचा चिडलेला आहे. संतप्त आहे. भारतीय अधिकाऱ्याच्या अंगावर तो अक्षरशः लांडग्यासारखा झेपावून जात आहे-- त्याच्या चेहऱ्यावर द्वेष-मत्सर-- अहंकार-- खुनशीपणा मूर्तिमंत भरलेला आहे--! भारतीय अधिकारी त्याचे बारसे जेवलेला आहे. जातिवंत कुस्ती-गीर आहे. असे काही डावपेच करीत आहे कीं पाकी अधि-काऱ्याला उलटापालटा करून आपटीत आहे--!

भारतीय सेना डाक्क्याच्या चारी बाजूंनी एकदम घुसली, एखाद्याचे नरडे आवळावे तसे पूर्व बंगाल आवळले. दोनच

दिवसांत तेथील हवाईदल नष्ट करून टाकले. औषधालाही विमान उरले नाही. नाविकदलाने साऱ्या पाकी बंदरांची नासधूस करून टाकली. सारी बंदरे भाजून पोळून काढली. दिसतील त्या बोटी बुडविल्या. शेकडो गनबोटी समुद्रतळाशी नेल्या. कराचीपासून चित्तगांवपर्यंत सागरावर भारतीय बोटींचा पहारा होता. याचा अर्थ उघड आहे. पूर्व व पश्चिम पाकिस्तानचा संबंध तोडला गेला होता. सागरी व हवाई रसद बंद पाडली होती.

पीरगंज आघाडीचा पाकी कमांडिंग ऑफिसर हवालदील झालेला आहे ! ३२ व्या बलुची तुकडीचा लेफ्टनंट कर्नल सुलतान मोहंमद घाईला आलेला आहे. त्याच्या हातात लांब पल्ल्याची दुर्बीण आहे. उंच ठिकाणी चढून तो पीरगंजचा परिसर पाहात आहे. जिकडे पाहावे तिकडे त्याला भारतीय जवान दिसत आहेत. भारतीय जवान स्वैर फिरत आहेत. त्यांच्या मदतीला आहे मुक्तिवाहिनी. दहा वर्षांच्या पोरापासून साठ वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत मुक्तिवाहिनीत सारे सामील झालेले आहेत. त्या पाकी अधिकाऱ्याच्या मुठी संतापाने वळत आहेत. त्याने गळ्यात अडकवलेली दुर्बीण रागाने झटकली व तो खाली आला.

तोच आकाशात हेलिकॉप्टर्स घिरट्या घालू लागली. त्यांचा तांडाच्या तांडा आला. जवळच ती हेलिकॉप्टर्स उतरली. भारतीय जवान त्यामधून भराभर बाहेर पडू लागले. त्यांच्याबरोबर दारूगोळाही होता. तो तांडा वर जाईपर्यंत दुसरा तांडा आला. चारी बाजूंनी जवान पीरगंजच्या ठाण्याकडे येऊ लागले. वाटेतील सारे पूल पाकी सेनेने व मुक्तिवाहिनीने उडवून लावल्यामुळे बांगला आघाडीवर हेलिकॉप्टर्सचा वापर सर्रास झाला. भारतीय हवाई दलाने ही कामगिरी चोख बजाविली.

भारतीय जवानांनी आपल्याला वेढले आहे हे ले. क. मोहंमदने ओळखले. त्याला काही सुचेना. आपल्या हाताखालील लोकांना तो हाका मारू लागला. हुकूम देऊ लागला. पण कोणीच त्याच्या हाकेला ओ दिली नाही. तो खोलीतून बाहेर आला व गर्जू लागला. औषधालाही त्याच्या सेनेतील मनुष्य उरला नव्हता. सारे पळून गेले होते. ज्या दिवशी भारतीय कारवाईला आरंभ झाला. त्या क्षणापासून पाकी पळपुटे पळत सुटले होते. डाक्क्याच्या चारी बाजूला हीच परिस्थिती होती. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दाद न देता सारे पळत होते. त्यांनी आजपर्यंत तेथे माणुसकीला काळिमा लावणारी कृत्ये केली होती. ही कृष्णकृत्ये करताना त्यांना कशाचीही दिक्कत वाटली नव्हती. सैतानांची पाशवी वृत्ती जागी केली होती. पाकी अधिकाऱ्यानी मानवी रक्ताला चटावलेल्या ह्या लांडग्यांनी हजारो बंगाल्यांची कत्तल केली होती. लाखो बंगाली भारताच्या आश्रयाला आले होते. आता भारतीय जवान पाहताच ते पळत सुटले. आपली आता खैर नाही हे त्यांनी ओळखले.

ले. क. सुलतान मोहंमद पराकोटीचा चिडला. त्याचा बटलर आत चहा करीत होता.

"अब्दुल" सुलतान मोहंमद गरजला.

"किधर भाग गये सब कुत्ते ?"

"साब ! मुझे क्या मालूम" अब्दुल खाली मान घालून म्हणाला, "मै तो अंदर था—!" "बेवकूफ" सुलतान मोहंमद डोळे लालबुंद करून जवळ जवळ ओरडलाच, "चलो मेरे साथ"

फिसाळलेल्या कुत्र्यासारखा सुलतान मोहंमद बाहेर आला. चारी

बाजूला भारतीय सेना पाहून तो संतापला. त्याने बंदूक चालू केली· अब्दुलला हातबॉम्ब टाकण्यास सांगितले.

भारतीय जवानांनी हा कमांडिंग अधिकारी एकटा पडलेला आहे हे ओळखले. ह्याला ठार न मारता "घेराओ" करण्याचे ठरविले. एक जवान लपतछपत त्याच्या पाठीमागून आला. त्याने त्या अब्दुलला पाठीमागून गोळी घातली. अब्दूल खाली कोसळताच सुलतान मोहंमदाचा सारा जोम आटला. तो पटकन बंदूक टाकून खोलीत पळाला. कडी घालून आत बसला. भारतीय जवान पाहता पाहता एकदम जवळ आले. त्याच्या घराला वेढा घातला. आता काही तरी युक्ती करून त्याला बाहेर काढायला हवा होता.

तेवढ्यात कॅप्टन भूपेंद्रसिंग पुढे आले. त्यांनी दार ठोठावले.

"दरवाजा खोलो. मै कॅप्टन भूपेंद्रसिंग बोल रहा हूँ" कॅप्टन भूपेंद्रसिंग म्हणाले.

काही प्रत्युत्तर नाही.

"दरवाजा खोलो, नहीं तो तोड दूंगा" कॅप्टन भूपेंद्रसिंग गरजले.

दाराबाहेर हातात पिस्तूल घेऊन ते उभे होते. सारी सेना तेथे गोळा झालेली होती. दार उघडण्याचे काहीच चिन्ह नव्हते. तो काही उत्तरही देत नव्हता. तीनचार जवानांनी लाथा मारून दरवाजा फोडताच पिस्तूल रोखून सुलतान मोहंमद बाहेर आला. समोरच्या कॅप्टन भूपेंद्रसिंगांच्यावर तो गोळचा मारणार तोच एका जवानाने त्याला टाच घालून पाडले. पिस्तूल लांब उडाले. आता सुलतान मोहंमद हातपाय आपटीत उभा राहिला.

एकाकीपणामुळे तो संतप्त झाला होता. पिसाळला होता. दातओठ खात उभा राहिला.

" चलो हमारे साथ " कॅप्टन भूपेंद्रसिंग म्हणाले.

" आप अकेले हो...आपका कोई आदमी आपके साथ नहीं है। पीरगंज हमारा हो चुका है "

" नहीं आऊंगा " सुलतान मोहंमद गरजला.

" आपको आना पडेगा " कॅप्टन भूपेंद्रसिंग म्हणाले.

" नहीं आऊंगा ! नही आऊंगा ! ! नही आऊंगा ! "

" तो क्या करोगे ? "

" दिखाऊ ? "

" हाँ "

कॅप्टन भूपेंद्रसिंग " हाँ " म्हणत आहेत तोवरच सुलतान मोहंमद त्याच्या अंगावर धावून गेला. कॅप्टन भूपेंद्रसिंगांचे शरीर कमावलेले होते. त्या बलुची मोहंमदाला चारीमुंड्या चीत ते करू शकले असते. लहानपणापासून त्यांना कुस्त्यांचा नाद होता. त्यामुळे त्या बलुच्याचे त्यांना काहीच वाटले नाही. तो धावून येताच आसपासचे जवान एकदम पुढे आले. त्यांनी त्या बलुच्याला ठोकायला आरंभ केला.

" ठहरो " कॅप्टन भूपेंद्रसिंग म्हणाले, " उन्हे अकेला छोडो. मै उनका बंदोबस्त कर सकता हूं...अब देखो तमाशा. "

कॅप्टन भूपेंद्रसिंगांनी त्या बलुच्याला क्षणार्धात खाली लोळविले. त्याला पुन्हा उठू दिले. तो उठताच पुन्हा कुस्ती जुंपली. आत्तापर्यंत जवानांनी निरनिराळ्या चित्रपटांत ' अशा ' कुस्त्या पाहिल्या होत्या. दोन अधिकारी शस्त्र न घेता लढत होते. ' फ्रीस्टाईल ' चा वापर मधून मधून जोरात चालू होता. कॅप्टन भूपेंद्रसिंगांनी त्या बलुच्याला पुन्हा एकदा खाली पाडले व ते त्याच्या छातीवर बसून त्याचे डोके खाली आपटू लागले. तो बलुची विलक्षण थकला

होता. पण तरीही तोंडाने शिव्या देत होता. सारी शक्ती एकवटून त्याने धडपड केली व कॅप्टन भूपेंद्रसिंगांना खाली ढकलून तो उठला. तो उठण्यापूर्वीच कॅप्टन भूपेंद्रसिंग सावध होऊन उभे होते.

"कुत्ते" मोहंमद म्हणाला.

"कमीने" कॅप्टन भूपेंद्रसिंग गरजले "देख मेरी कमाल."

त्यानी बलुच्याला पुन्हा 'जमीनदोस्त' केले. त्याच्या छातीवर बसून त्याचे नरडे जोराने आवळण्यास प्रारंभ केला. बलुची गुरासारखा ओरडू लागला. डोळे पांढरे झाले. कॅप्टन भूपेंद्रसिंगांनी आपला पवित्रा बदलला. त्याला इतक्या लवकर ठार मारता कामा नये. त्याला हालहाल करून मारायला हवाय.

बलुची पुन्हा उठला. आता तो अक्षरशः लांडग्यासारखा कॅप्टन भूपेंद्रांच्या अंगावर धावला. ते भितीजवळ उभे होते. पटकन जरा बाजूला गेले. बलुची भितीवर इतक्या जोराने आपटला की त्याचे डोके रक्तबंबाळ झाले. ही अजब लढाई सारे जवान पाहात होते. प्रथमच त्यांना हे पाहायला मिळाले की आपले कॅप्टनसाहेब चांगले कुस्तीगीर आहेत. त्या बलुची लांडग्याला ते सहज लोळवतील. भारतीय जवानांच्या मागे पीरगंजचे गावकरीही गोळा होऊ लागले होते. गेले वर्षभर त्यांना सतावणारा लांडगा अखेरचे श्वास घेत होता हे पाहून ते आता टाळ्या वाजवू लागले. कॅप्टन भूपेंद्रसिंगांचा जयजयकार करू लागले.

दोघांची पुन्हा विलक्षण झोंबाझोंबी सुरू झाली. कॅप्टन भूपेंद्रसिंग जितक्या शांततेने 'खेळत' होते तितका तो बलुची चिडत होता. त्याची खुमखुमी अजून जिरत नव्हती, जिरलेली नव्हती. कॅप्टन भूपेंद्रसिंगांनी त्याच्या तोंडावर व छातीवर असे काही ठोसे मारले की त्या बलुच्याची दमछाट झाली. नाकातोंडातून रक्त

येऊ लागले. तो विलक्षण वगाने पुन्हा एकदा कॅप्टन भूपेंद्रसिंगांच्या अंगावर धावून येताच त्यानी ' धोबीपछाड ' घालून त्याला खाली पाडला. आता मात्र ते त्याला जिवंत सोडणार नव्हते. त्यानी त्याला असा काही कुबलला की विचारायची सोय नाही. तो बेशुद्ध झाल्यावर त्याचे डोके जमिनीवर इतक्यावेळा त्यांनीं आपटले की त्याचे सारे डोके रक्तबंबाळ झाले. त्यांनी त्याच्या शर्टाला धरून त्याला दोन पायांवर तिरपे उभे केले व तीनदा खाली जोराने आपटले.

तो मगरूर बलुची मरताच साऱ्यांनी टाळ्या वाजविल्या. जवानांनी व गांवकऱ्यांनी कॅ. भूपेंद्रसिंगांच्या नावाच्या घोषणा करून त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले !

मत्सराने---सूडाने पेटलेला पाकी अधिकारी हा पाकी वृत्तीचा प्रतिनिधी समजावा. याह्यासुराचा प्रत्येक अधिकारी भारताविरुद्ध अशा तऱ्हेच्या सूडाने संतापलेला आहे.

अशा सैतानांचा बंदोवस्त करणारे वीर भूपेंद्रसिंग आमच्या सेनेत ठिकठिकाणी आहेत.

म. ग्रं. सं. ठाणे.
क्र. १६२३८
वि. बा. वा.
IRBK-0116237
IRBK-0116237